
# हाकारा

वर्ष बारावे : अंक तिसरा
जुलै-सप्टेंबर १९९१



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा : कै. गं. बा. सरदार**

**❋ कार्यकारी मंडळ ❋**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | जनार्दन पोहऱ्या वळवी |
| **उपाध्यक्ष** | : | शरद कुलकर्णी |
| **सचिव** | : | रा. के. मुटाटकर |
| **सहसचिव** | : | सुधीर जोग |
| **खजिनदार** | : | वि. श्री. कुलकर्णी |
| **सदस्य** | : | श्रीमती मीराबाई तडवी |
| | : | श. गो. देवगावकर |
| | : | विजय साठे |
| | : | मिलींद बोकील |
| | : | जॉन गायकवाड |
| | : | पदमाकर वळवी |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## अनुक्रमणिका

१) संपादकीय ........ २
२) आदिवासी सेवक आणि आदिवासी क्रांती : बळवंत वळवी ........ ३
३) आदिवासींच्या जमिनींचे पुनर्प्रस्थापन : शरद कुलकर्णी ........ ६
४) आदिवासी कायदे पुरेसे पुरोगामी नाहीत : रा. वि. भुस्कुटे ........ ११
५) आदिवासी पंचायतीचा न्याय-निवाडा : दिलीप इंगळे ........ १४
६) आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणाचा अहवाल : रंजना कान्हेरे ........ १९
७) सातपुड्यातील आदिवासींच्या विकासाच्या माझ्या कल्पना : एस. पी. गिरासे ........ २२
८) अकोले तालुक्यातील आदिवासींची प्रगती व सुधारणा : एक अवलोकन : बी. एम. पवार ........ २७
९) आंबेगाव तालुक्यातील पश्चिम घाटावरील आदिवासींचे जीवन : एम. जी. असवले ........ ३०
१०) देवकी पोटवडली (कथा) : मारूती कुळमेथे ........ ३३
११) सवारी (एकांकिका) : भुजंग मेश्राम ........ ३५
१२) अनेक वर्षांपासून (दीर्घ कविता) : रवि कुरसंगे ........ ४१
१३) महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या : जॉन गायकवाड ........ ४३
१४) पुस्तक परीक्षण : विनायक तुमराम ........ ४६

वर्ष बारावे : अंक - तिसरा
जुलै-सप्टेंबर १९९१

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७

**संपादक :**
रामचंद्र मुटाटकर
**कार्यकारी संपादक :**
ग. शां. पंडित

मूल्य रु. १०/-

**प्रकाशक :**
रा. के. मुटाटकर
सचिव,
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
यांच्यासाठी
मे. इंप्रेशन्स्
३३६०/४, लिंगराज कॉलेज समोर
गोंधळी गल्ली क्रॉस रोड
बेळगाव - ५९० ००२ फोन : २१३०९
येथे छापून प्रसिध्द केले.

'हाकारा'स महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र व ॲन्थ्रोपॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, यांजकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

# संपादकीय

'हाकारा'च्या बाराव्या वर्धापन वर्षातला हा तिसरा अंक 'हाकारा'ची विशेषांकांची परंपरा थोडीशी शिथिल करून वैविध्यपूर्ण स्वरुपात आपल्या हाती देत आहोत. या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे यात विकासात्मक व सांस्कृतिक अशा दोन्ही अंगांनी आदिवासी समस्यांचा विचार केला आहे. बळवंत वळवी यांचा आदिवासी सेवक पुरस्कारावरील उपरोधिक लेख विचार करायला लावणारा आहे. आदिवासी निसर्गाच्या सान्निध्यात सतत वावरत असतात परंतु या नैसर्गिक साधनसंपत्तीचा आपल्या विकासासाठी कसा उपयोग करून घेता येईल याची जाण त्यांना नसते. सातपुड्यासारख्या निसर्गसंपन्न भागात विकासात्मक योजना कशा राबविता येतील याची कल्पना प्रा. गिरासे यांनी उत्तमरित्या करून दिली आहे. काहीसा अशाच स्वरुपाचा पाहणीवजा एक लहानसा शोध-निबंध बी.एम.पवार यांचा आहे.

आदिवासींचे स्वत:चेही काही कायदेकानू असतात व त्यानुसार त्यांचा न्यायनिवाडा होत असतो. पंचायतीने दिलेला न्याय किंवा केलेला निवाडा आदिवासी देवाच्या आज्ञेप्रमाणे मानतो, याविषयी उदाहरणांसहित माहिती करून दिली आहे दिलीप इंगळे यांनी.

पुणे जिल्ह्यात आंबेगाव तालुक्यातील महादेव कोळी, कातकरी इ. आदिवासी जमातींचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन व त्यांच्या समस्या काय आहेत याची माहिती एम.जी.असवले यांनी दिली आहे.

याशिवाय आदिवासी जमीनींचे हस्तांतरण, कायद्यांचे पुरोगामित्व, बिगर आदिवासी म्हणून वाढ इत्यादी प्रमुख समस्यांचाही उहापोह संशोधक व अभ्यासू व्यक्तींनी केला आहे. कथा, कविता, एकांकिका हे विषय मनोरंजक व चिंतनात्मक आहेत. अभिप्राय कळवावेत.

**संपादक**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# आदिवासी सेवक आणि आदिवासी क्रांती

लेखक : **बळवंत वळवी - नंदुरबार**

आदिवासी समाज सेवेचा प्रचंड पहाड उभा केल्यानंतर डोंगर पोखरून उंदीर काढावा त्याप्रमाणे एक लहानसा पिटुकला 'आदिवासी सेवक पुरस्कार' महाराष्ट्र शासनाने देऊन या महान विभूतीचा गौरव करण्याऐवजी अपमानच केला आहे, अशी भावना सुधारणेच्या अतिउच्च शिखरावर पोहचलेल्या आदिवासी समाजात पसरली आहे.

पूर्वीचे संत महात्मे आणि अत्यंत आधुनिक राजकारण करणाऱ्या इंग्रजांनी देखील ज्या ठिकाणी हात टेकले त्या ठिकाणी हे आदिवासी सेवक अत्यंत यशस्वी झाल्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करण्यासाठी आदिवासी बांधवांजवळ शब्द नाहीत. हा एक चमत्कार आहे.

आता समाजासाठी कोणत्याही सामाजिक विकासात्मक सवलतीची गरज राहीली नसून आदिवासी समाज आता स्वयंभू झाला. त्यांमुळेच सारे जग आपल्या भारतातील दैदिप्यमान अशा आदिवासी सुधारणांकडे मार्गदर्शनाच्या अपेक्षेने पाहात आहे.

आता राजकीयदृष्ट्यादेखील आदिवासी हा इतर समाजाचा (पुढारलेल्या) कच्चा माल म्हणून वापर करणार आहे. या देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती आणि केंद्रीय मंत्री आदिवासींचे मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांच्या वस्तीकडे वळलेले आहेत.

सुधारकांचा इतका महापूर या आदिवासी भागात आलेला आहे. त्यामुळे लहान-मोठ्या नद्यानाल्यांवर बांधलेले आदिवासी भागातील कोट्यावधी रुपयांचे पूल व रस्ते वाहून गेले आहेत तर ग्रामीण भागातील विकास कार्यालयांच्या इमारती ढासळू लागलेल्या आहेत. याला मूर्ख लोक भ्रष्टाचाराची परिसीमा असा शब्द वापरून या विकास कार्याला दोष देतात. अर्थातच याला आदिवासी सेवकाचा हातभार लागल्यानेच हे शक्य झाले. हे टीकाकारांना समजलेले आहे.

पिशवीतल्या शाळा याच काळात सुरू झाल्या आणि त्यामुळेच १००% आदिवासी तरुण देशाबाहेर उच्च शिक्षण घेण्यास लायक ठरले. आज ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत साऱ्या जगातच आदिवासी तरूण चमकू लागला आहे. एवढे पिशवीतल्या शाळांचे मोठे कार्य आहे. शिक्षणाची सर्व क्षेत्रं आदिवासींच्या ताब्यात असल्यामुळे त्यांना जेव्हा वाटेल तेव्हा शैक्षणिक धोरणात बदल करता येतो. येथे शैक्षणिक पदवीपेक्षा प्रत्यक्ष अनुभवाला महत्त्व दिले जात असल्यामुळे उच्चस्तरीय परीक्षांमध्ये ९९% आदिवासी मुलांना मुद्दाम नापास करून देशाच्या शारिरीक मेहनतीच्या रचनात्मक कार्याकडे वळविले जाते. एखादा अत्यंत बुद्धीमान (extraordinary brilliant) विद्यार्थी असला तरी त्याची एखाद्या दुसऱ्या समाजातील विद्यार्थ्याच्या बुदिमत्तेशी तुलना करून याला त्याच्यापेक्षा खालची श्रेणी देऊन मुद्दाम त्याची शारिरीक मेहनत करण्यासाठी खालच्या बाजूला रवानगी केली जाते. हे काम अत्यंत शास्त्रीय पद्धतीने केले जात असल्यामुळे आदिवासी समाजाला काही एक त्रास होत नाही. उलट त्याच्या प्रगतीत भरच पडली आहे. आदिवासी सेवक जागृत असल्यामुळेच हे शक्य झालेले आहे.

सर्व आदिवासी सेवकांनी एकत्र येऊन एक फर्मान काढून सकाळच्या वेळी टेंबरेल ऐवजी धोंड्याचा वापर करण्याचा आदेश दिल्यामुळे सकाळी उपयोगात आणलेला धोंडा दुपारी शेंदूर

लावून तो देव म्हणून पूजता येतो. शिवाय दुसरं पुण्यकर्म म्हणजे आदिवासी सेवक पाणी टंचाईवर मात करून भांड्यांची काटकसर करू शकला आहे. हा आमचा दावा खोटा आहे असे वाटल्यास शासनाने उच्चस्तरीय कमिशन नेमून याची सत्यता पडताळून पाहावी म्हणजे आपोआपच आदिवासी सेवकांचे महत्त्व लक्षात येईल.

आदिवासी समाजाने आता अन्नधान्यावरही मात केलेली आहे. तो आतापर्यंत जंगली कंदमुळे व जंगली फळे यावर गुजारणा करीत आहे. आणि आता हळूहळू कंदमुळे देखील सुकून जातील अशी चांगली परिस्थिती आदिवासी सेवकानी महत् प्रयत्नाने तयार केली आहे. आता अन्न आणि कंदमुळांऐवजी केवळ हवेवर जगता येईल काय? या वर संशोधन सुरू आहे. याबाबतीत आदिवासी सेवक यशस्वी झाल्यास या देशातील सर्व आदिवासी लोकसंख्या केवळ हवा खाईल आणि अन्नधान्यावरचा तेवढा अतिरिक्त ताण कमी होईल. कदाचित हवेचे सेवन केल्यामुळे ही जनता सामान्य माणसाप्रमाणे पृथ्वीवर वास्तव्य न करता ते स्वर्गात आपोआपच निघून जातील. त्यामुळे भारतावरचा लोकसंख्येचा भारही कमी होईल. एवढ्या मोठ्या लोकसमूहाला एकसाथ स्वर्गात पाठविण्याचे धाडस कोणत्याही संताने केले नाही. ते आदिवासी सेवकाच्या कार्यपद्धतीमुळे आपोआपच घडून येणार आहे.

याची सुरुवात म्हणून स्वातंत्र मिळाल्यापासून आदिवासी सेवकांनी आदिवासी जनतेला मुद्दाम दिवसातून एकच वेळ तेही अर्धपोटी किंवा अत्यंत निकृष्ट अन्न द्यावे अशा सूचना केलेल्या होत्या. या सूचनांचे सर्व आदिवासी जनतेने अत्यंत प्रामाणिकपणे पालन केले. एवढेच नव्हे तर कित्येक आदिवासी कुटुंबे वर्षातून बरेच दिवस आपल्या स्वयंपाकाच्या चुलीच पेटवित नाहीत. आणखी त्यापैकी काही घरी राहिल्यानंतर भूक लागेल म्हणून गुजरातसारख्या राज्यात निघून जातात. इतकी त्यांची भौतिक, अध्यात्मिक आणि धार्मिक प्रगती आहे.


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या माणसाला इतक्या चांगल्या गोष्टी का लक्षात आल्या नाहीत हेच आश्चर्य आहे. नाही तर त्यांनी या तत्त्वाचा घटनेत निश्चितपणे उल्लेख केला असता. परंतु घटनेत उल्लेख नसला तरी म्हणून काय झाले? आदिवासी सेवकांनी हे सारे करून दाखविल्यामुळे भारतीय राज्यघटनेत या प्रमाणे आपोआपच बदल होईल. म्हणजेच याचा अर्थ असा की घटना बदल करण्याचे सामर्थ्य देखील केवळ आदिवासींच्या हाती आलेले आहे.

आदिवासी हा वनस्पती कंदमुळे खात राहिल्यामुळे त्याची नैसर्गिक प्रतिकार शक्ती प्रचंड असते. त्यामुळे आदिवासी भागातल्या विशेषतः ग्रामीण रुग्णालयामध्ये चांगल्या औषधांचा पुरवठा अथवा साठा करण्याची गरज अजिबात नसते. हा पुरवठा शहरातल्या दवाखान्याकडे वळवून शहरी लोकांची काळजी घेता येते किंवा ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांना सरकारी दवा औषधी यांचा खाजगी व्यापार करण्यास मुक्त मुभा देऊन व्यापक हित साधले जाते. असे होत राहावे यासाठी आदिवासी सेवक प्रयत्नशील असतात.

आदिवासींचे सुवर्ण-युग : स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच नव्हे तर काही शतकांपूर्वीपासून आदिवासी जगात 'सुवर्ण युग' सुरू झाले आहे. याची उदाहरणे इतिहासाच्या पानोपानी दिसून येतीलच. स्वातंत्र्यानंतर त्याची अधिकच भरभराट झालेली आहे. त्याला गरज नसताना घरकुलांची निर्मिती करण्यात आली. त्याची जमीन त्याने इतरांना देऊन टाकली आणि तो विचारपूर्वक भूमिहीन बेघर झाला. घरात वॉशबेसिन ऐवजी तो लाकडी उतरल्या धडवंचीतून हात धुतो. कुकर व तांब्या पितळेच्या भांड्याऐवजी मातीचे पातेले व मातीच्या भांड्यातून जेव्हा अन्नाची गरज असते तेव्हा स्वयंपाक करतो. (वर्षातून फक्त काही दिवस.) कारण त्यानी मुद्दाम ठरविले आहे कमी

अन्न वापरायचे आणि ते देखील निकृष्ट निसत्त्व. अशाच प्रतिचे अन्न स्वत:साठी ठेवून बाकी जे काही तो निर्माण करतो ते त्याला त्याच्या बाहेरच्या समाजाला दान करायचे असते. भोवतालच्या समाजासाठी किंवा एकूण जगासाठी त्याला मरायचे असते. परंतु मरण येत नाही म्हणून तो मुद्दाम जगत असतो. आज त्याच्या घराघरातून सोन्याचा धूर निघतो आहे. सगळीकडे त्याचा मानमरताब होतो आहे. त्याला बिगर आदिवासी समाज, भिल्टा, नेचडा, भिल्ल, नरोटा या आदरार्थी नावाने हाक मारू लागला आहे. एवढे त्याचे महत्त्व वाढले आहे.

आदिवासी सेवकांना कितीही मोठी सत्ता दिली तरी त्यांना सत्तेचा समाजासाठी कमाल वापर करण्याची गरज नसते. कारण त्यांच्या सत्तेचा वापर त्यांच्या हाताखाली असलेले शागिर्द आपोआपच चालवतात. त्यामुळेही आदिवासी समाज एवढ्या वेगाने पुढे जाण्यास मदत झाली आहे.


क्या सर्दी-ज़ुकाम
आपको जकड़े रहता है?


झंडू फार्मास्युटिकल वर्क्स लि.,
गोखले रोड, दक्षिण दादर, बंबई ४०० ०२५.
पूरी जानकारी के लिए इस्तेमाल करने से पहले पैक पर दिये ये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ लीजिए.


## दीड वितीचे फाटकं लुगडं

*उजाड वस्तीत, मदहोश महेफिल रंगली होती,*
*सात सुरातील जुनेच गाणे,*
*खालच्या पट्टीत गात होती।*

*येथील कामपिपासु अर्धवेड्यांनी,*
*अब्रु लुटल्याचा पुरावा देत होती,*
*व धिप्पाड देहाला,*
*दीड वितीच्या फाटक्या लुगड्यानी झाकीत होती।*

*पाण्याची तहान, रक्ताने भागविणाऱ्या विरुद्ध*
*निघालेल्या दोन लोकांच्या मोर्चास सांगीत होती*
*हे माणसा लपू नकोस,*
*दोन्ही बाजूने तेच आहेत.*
*पुढे चाल तू,*
*माझं जीवनपण, तुमच्यासाठी जगत आहे।*

*तुम्ही सरळ रस्त्याने, मोर्चा जा घेवून,*
*मीही येते, तुमच्याच मागून।*
*वाटेत, मला मरण आले तर,*
*अन्त्यसंस्कार करण्यापूर्वी,*
*माझ्या अंगावरील दीडवितीच्या, लुगड्याला घे,*
*आणि दारबंद घरातील, माझ्या मुलीला नेवून दें,*
*तेच एकुलतं एक लुगडं, घालून तीही घराबाहेर येईल,*
*जगाला ओरडून तुझाच मार्ग सांगेल!*

-- **एल्. के. मडावी,** अमरावती

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# आदिवासींच्या जमिनींचे पुनर्प्रस्थापन :

लेखक : **शरद कुलकर्णी**

**प्रास्ताविक :**

आदिवासींच्या ताब्यातील शेतजमिनी जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय हस्तांतरीत करता येणार नाहीत, अशी एक तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ यात होती. या तरतुदीचा मुक्त हस्ताने वापर करून आणि इतरही वरकरणी कायदेशीर मार्गांचा अवलंब करून बिगरआदिवासींनी आदिवासींच्या शेतजमिनी मोठ्या प्रमाणावर बळकावल्या. यापैकी काही हस्तांतरणे पूर्णतया बेकायदेशीर होती तर काही कायदेशीर होती. १९६९-७० या वर्षात आदिवासींनी अशा हस्तांतरणाविरुद्ध चळवळी केल्या.

**वर्तक कमिटी :**

आदिवासींच्या जमिनींच्या हस्तांतरणाविषयी चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने त्यावेळचे महसूलमंत्री श्री. ह.गो. वर्तक यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने यापुढील काळात अशी हस्तांतरणे होऊ नयेत आणि बेकायदा झालेली हस्तांतरणे रद्द व्हावीत यासाठी एक कायदा करावा असे सुचविले. या समितीला, बरीचशी हस्तांतरणे जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन कूळ कायद्याचा फायदा घेऊन कोर्टातर्फे डिक्री मिळवून यासारख्या वरकरणी कायदेशीर मार्गांनी झाली आहेत, असे आढळून आले. अशा हस्तांतरीत जमिनी मूळ आदिवासी मालकांना परत मिळवून देण्यासाठी एक खास कायदा करावा अशी शिफारस समितीने केली.

**पहिला अध्यादेश आणि कायदा :**

या शिफारशीनुसार आदिवासींच्या जमिनींच्या हस्तांतरणाची प्रक्रिया रोखण्यासाठी आणि त्यांच्या बेकायदेशीररित्या हस्तांतरित जगिनी त्यांना पुन्हा मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ६ जुलै १९७४ रोजी एक अध्यादेश जारी केला. या अध्यादेशानुसार आदिवासी जमिनींच्या हस्तांतरणासाठी शासनाची पूर्व अनुमती बंधनकारक ठरविण्यात आली. त्याचप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याची परवानगी न घेता झालेल्या हस्तांतरित जगिनी मूळ आदिवासी मालकांना परत मिळवून देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याला देण्यात आले. या कायद्याची कार्यकर्त्यांना माहिती व्हावी म्हणून एक पुस्तिकाही प्रसिद्ध करण्यात आली - (आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण : नवा कायदा : लेखक - शरद कुलकर्णी, ग्रामधन प्रकाशन, १९७४). या अध्यादेशाचे पुढे कायद्यात रुपांतर झाले. (महाराष्ट्र लँड रेव्हिन्यू कोड अँड टेनन्सी लॉज (ॲमेंडमेंट) ॲक्ट, १९७४; कायदा क्रमांक ३५/७४).

**दुसरा कायदा :**

वरकरणी कायदेशीर मार्गांनी म्हणजे जिल्हाधिकाऱ्याची परवानगी घेऊन केलेली विक्री, अदलाबदल, देणगी, लिलावात घेतलेल्या जमिनी यासारख्या मार्गांनी हस्तांतरित झालेल्या जमिनी त्यांना मिळवून देण्यासंबंधीचे कायद्याचे विधेयक विधानसभा आणि विधानपरिषद यांनी सप्टेंबर १९७४ मध्ये एकमताने मंजूर केले. दुर्दैवाने सर्वसाधारणपणे लबाडीनेच परंतु कायद्यातील त्रुटींचा फायदा घेऊन हस्तांतरित झालेल्या जमिनी आदिवासी मालकांना परत करण्याच्या प्रक्रियेला खूप विरोध झाला. या विधेयकाला राष्ट्रपतींची परवानगी मिळण्यास नऊ महिन्यांचा कालावधी लागला आणि संमती मिळाली तीही अशी संमती

दिली नाही याविषयी ओरड झाल्यावरच ("आदिवासींच्या हस्तांतरित जमिनी परत मिळण्यास विलंब का?" शरद कुलकर्णी, महाराष्ट्र टाइम्स - ४ फेब्रुवारी १९७५). त्यानंतर संमती मिळून हा कायदा १ नोव्हेंबर १९७५ रोजी अमलात आल्याचे जाहीर करण्यात आले. या कायद्याविरुद्ध मालमत्तेच्या मूलभूत हक्काविषयीच्या राज्य घटनेच्या कलमाखाली आक्षेप घेतले जाऊ नयेत म्हणून तो घटनेच्या नवव्या अनुसूचीत समाविष्ट करण्यात आला. तरीही बिगर आदिवासी मालकांनी या कायद्याविरुद्ध आक्षेप घेणारे दावे मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल केले. या कायद्याच्या अंमलबजावणीविरुद्ध स्थगिती आदेश मिळविण्यात आले. सुमारे ८ वर्षानंतर म्हणजे डिसेंबर १९८४ मध्ये हा कायदा कायदेशीर असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.

**कायद्यातील प्रमुख तरतुदी :**

हस्तांतरामुळे आदिवासी मालकाच्या जमिनींची मालकी बिगर आदिवासींकडे आली असेल किंवा आदिवासी मालकाला अदलाबदलीनिमित्त मिळालेल्या जमिनींची किंमत त्याने दिलेल्या जमिनीच्या किंमतीपेक्षा कमी असेल आणि अशी हस्तांतरित जमीन बिगर आदिवासी जमीन मालकाकडे असेल आणि ही जमीन ६ जुलै १९७४ रोजी किंवा यापूर्वी बिगर शेतकी कामासाठी वापरण्यात येत नसेल तर त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यातील किंवा कोर्टाच्या हुकूमांतील तरतुदीकडे दुर्लक्ष करून जिल्हाधिकारी आपण होऊन कधीही किंवा हस्तांतर करणाऱ्या आदिवासी मालकाने या कायद्याची अंमलबजावणी झाल्यापासून ३ वर्षाच्या आत केलेल्या अर्जान्वये आणि योग्य चौकशीनंतर पुढील प्रकारचे हुकूम देऊ शकेल :-

(१) जमिनीचे हस्तांतरण करणाऱ्या आदिवासी मालकाची आणि ह्या हस्तांतरात बिगर आदिवासीला मिळालेल्या जमिनीची अदलाबदल रद्द समजण्यात यावी. मात्र ही अदलाबदल करताना जमीन सुधारणेवर झालेला खर्च ह्या कायद्यात दिलेल्या तरतुदीप्रमाणे निश्चित करण्यात यावा आणि सुधारित जमीन मिळालेल्या मालकाने सुधारणेसाठी खर्च केलेल्या मालकाला ती रक्कम परत द्यावी (कलम ४-ब).

अशा हस्तांतरात आदिवासीने १ एप्रिल १९५७ (जमीन कसेल त्याच्या मालकीची करणारा दिवस) पासून ६ जुलै १९७४ पर्यंत (आदिवासींच्या जमिनीच्या हस्तांतराला प्रतिबंध करणाऱ्या तरतुदी अंमलात आल्याचा दिवस) बिगर आदिवासीला पुढील प्रकारे दिलेली हस्तांतरे येतात :-

(अ) विक्री, देणगी, अदलाबदल, गहाण किंवा खंडाने व इतर तोंडी व्यवहाराने झालेली हस्तांतरे.

(ब) कोर्टाच्या हुकूमान्वये किंवा डिक्रीखाली झालेली हस्तांतरे.

(क) आदिवासीकडून शेतसाऱ्याची किंवा शेतसाऱ्याप्रमाणे गणली जाणारी इतर बाकी वसूल करण्यासाठी तसेच महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, १९६० या अन्वये किंवा इतर कायद्यान्वये झालेली हस्तांतरे. मात्र यातून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ३६ (३) या अन्वये झालेल्या हस्तांतरित जमिनी वगळण्यात आल्या आहेत.

ही तरतूद आदिवासींच्या मालकीच्या जमिनीचा कब्जा बिगर आदिवासींकडे दिल्या गेलेल्या जमिनीविषयी आहे. ह्या तरतुदीनुसार, आदिवासीने त्याच्या जमिनीचा कब्जा जिल्हाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता बिगर आदिवासीकडे दिला आणि कब्जेदार नजिकचा वारस नसताना मरण पावला तर कब्जा दिल्यापासूनच्या दोन वर्षाच्या काळात कब्जा दिलेल्या आदिवासीला किंवा त्याच्या वारसाला ती

जमीन आपल्या ताब्यात द्यावी असा अर्ज करता येईल. त्यावर जमीन महसूल व इतर देणी ठरवून जिल्हाधिकारी नेमून देण्यात आलेल्या तरतुदीनुसार निर्णय घेऊ शकेल.

अशा जमिनीसंबंधी १९७४ साली आदिवासी जमिनीविषयक पहिल्या कायद्यात एक विशेष तरतूद करण्यात आली. ह्या तरतुदीनुसार हस्तांतरित झालेल्या जमिनीचा ताबा बिगर आदिवासीकडे असेल आणि तिचा शेतीव्यतिरिक्त इतर कामासाठी उपयोग होत असेल तर जिल्हाधिकाऱ्याला आपण होऊन कधीही कायदा लागू झाल्यानंतर ३ वर्षाच्या आत आदिवासीने अर्ज केल्यास अशा जमिनीचा ताबा त्याला देता येईल. म्हणजेच आदिवासींच्या जमिनीचा कब्जा बिगर आदिवासीकडे गेल्यावर दोन वर्षांच्या आत अर्ज केला पाहिजे ही मुदत काढून टाकण्यात आली तसेच दोन वर्षांच्या आत अर्ज न केल्यामुळे बिगर आदिवासीकडे कब्जा कायम झालेल्या जमिनीही आदिवासींना परत मिळवून देण्याविषयीही त्यावेळी तरतूद केली गेली.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आदिवासींची जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगी-शिवाय हस्तांतरित झालेली जमीन कब्जा दिल्यापासूनच्या दोन वर्षांच्या काळात त्याने अर्ज केल्यास परत मिळू शकेल, अशी तरतूद जमीन महसूल कायद्यात होती. म्हणजेच कब्जा दिल्यानंतर दोन वर्षानंतर अशी हस्तांतरीत जमीन परत मिळण्याचा आदिवासींचा अधिकार गमावला जाई. आदिवासी जमिनीच्या हस्तांतरविषयक पहिल्या कायद्यातील तरतुदीनुसार असा अधिकार गमावलेल्या जमीनी देखील जिल्हाधिकाऱ्यांना आपण होऊन कधीही तसेच कायदा जारी झाल्यापासून तीन वर्षांच्या आत अशा आदिवासीने अर्ज केल्यास परत मिळवता येतील.

ह्या तरतुदीनंतरही कायद्यात एक उणीव राहिली आणि ती म्हणजे आदिवासी जमीन मालकाने किंवा त्याच्या वारसाने जमीन करण्यास असमर्थता व्यक्त केली किंवा तिची खरेदी किंमत तसेच सुधारणांची किंमत द्यावयास तो तयार नसला तर काय करावे ह्याविषयी तरतूद नव्हती. म्हणजेच ह्या जमिनीची मालकी बिगर आदिवासीकडेच राहण्याची शक्यता होती. त्यामुळे आदिवासी जमीन मालकावर किंवा त्याच्या वारसावर जमिनीचा कब्जा घेण्यास नकार द्यावा असे दडपण येण्याची शक्यता होती. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक खास दुरूस्ती कायदा केला (३०/१९७७) ह्या कायद्यातील दुरूस्तीनुसार आदिवासीने किंवा त्याच्या वारसाने अशा प्रकारे जिल्हाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी न घेता हस्तांतरित झालेल्या जमिनीचा परत कब्जा घेण्यास नकार दिला तर तिचा कब्जा राज्य सरकारकडे जाईल आणि अशा जमिनीची किंमत व त्यावरील सुधारणांची किंमत सरकार बिगर आदिवासीला देईल अशी योजना करण्यात आली. अशी सरकारने ताब्यात घेतलेली जमीन नंतर जमीन असलेल्या गावात राहणाऱ्या किंवा जमिनीपासून पाच किलोमीटर अंतरात राहणाऱ्या व जमिनीची किंमत व त्यावरील सुधारणांची किंमत भरण्यास तयार असलेल्या दुसऱ्या आदिवासीला देण्यात यावी अशी तरतूद केली गेली.

जमिनीचे हस्तांतरण ६ जुलै १९७४ पूर्वी झाले असल्यास आणि ज्या बिगर आदिवासीकडे जमीन हस्तांतरित झाली आहे त्याची जमीन सार्वजनिक कार्यासाठी सरकारने ताब्यात घेतली असल्यास, हस्तांतरित जमिनीपैकी फक्त अर्धी जमीन बिगर आदिवासीला परत केली जाईल. (ही तरतुद मुख्यत्वेकरून कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या आणि रायगड जिल्ह्यात पुनर्वसन करण्यात आलेल्या बिगर आदिवासींसाठी आहे).

हस्तांतरित जमीन परत मिळण्यास पात्र असलेल्या आदिवासीने ती जमीन तो स्वतः कसणार आहे आणि जिल्हाधिकाऱ्याने जमीन

सुधारणीवर केलेला खर्च म्हणून ठरविलेली रक्कम बिगर आदिवासी चालकाला द्यावयास तयार आहे अशी हमी दिल्यासच त्याला मिळू शकेल. मात्र कायदेशीर अज्ञानाच्या बाबतीत अशी हमी त्याच्या पालकाला देता येईल. इतर कायदेशीर अपात्रता असलेल्या माणसाच्या बाबतीत त्याची हमी त्याच्या अधिकृत एजंटला देता येईल.

ह्या कायद्यात ज्याची जमीन हस्तांतरित झाली आहे त्याचा विचार करताना त्याच्या वारसांचा विचार करण्यात आला आहे. तसेच आदिवासींची जमीन ज्याला मिळाली आहे त्याचा विचार करताना त्याचे वारस व त्याने किंवा त्याच्या वारसाने १५ मार्च १९७१ रोजी किंवा त्यानंतर ज्या आदिवासी किंवा बिगर आदिवासीकडे जमीन हस्तांतरित केली आहे अशा व्यक्तीचाही समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच ह्या कायद्याच्या कक्षेत बिगर आदिवासीकडे १ एप्रिल १९५७ पूर्वी हस्तांतरित झालेल्या जमिनी येत नाहीत. तसेच बिगर आदिवासी मालक किंवा त्याचे वारस यांनी १५ मार्च १९७१ पूर्वी दुसऱ्या व्यक्तींकडे हस्तांतरित केलेल्या जमिनी येत नाहीत. त्याचप्रमाणे ६ जुलै १९७४ रोजी किंवा त्यापूर्वी बिगर शेतकी कामासाठी वर्ग केलेल्या जमिनी येत नाहीत.

**अपिलाची तरतूद :**

जमीन परत करण्याच्या किंवा न करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निकालाविरूद्ध महाराष्ट्र जमीन महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल. मात्र हे अपील जिल्हाधिकाऱ्याचा हुकूम मिळाल्यानंतर ६० दिवसांचे आत केलेले असावे. असे अपील करताना कायद्याने ठरवून दिलेल्या कोर्ट फीचे तिकीट लावावे लागेल. अशा प्रकरणात महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने दिलेला निकाल अंतिम राहील (कलमे ६,७,८,९).

ह्या कायद्याखाली जिल्हाधिकाऱ्याने / आयुक्ताने / महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने, किंवा राज्य सरकारने निकालात काढलेल्या प्रकरणांचा विचार मुलकी न्यायालयाच्या अधिकारकक्षेत असणार नाही. आणि अशा - न्यायालयाला त्याविषयी विचार करता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद ह्या कायद्यात करण्यात आली आहे. (कलम १०).

जिल्हाधिकाऱ्याने ह्या कायद्यानुसार जमिनींचा कब्जा मूळ आदिवासी मालकाला परत द्यावा असा हुकूम दिल्यानंतरही जमिनीचा कब्जा बिगर आदिवासीकडे असेल तर असा हुकूम दिल्यानंतरच्या वर्षापासून प्रत्यक्ष कब्जा दिल्यापर्यंतच्या काळातील जमिनीच्या वापराबद्दल जिल्हाधिकारी ठरवील ती नुकसानभरपाई बिगर आदिवासीने आदिवासीला द्यावी अशीही तरतूद कायद्यात आहे.

मूळ कायदा व त्यानंतर त्यात झालेल्या दुरूस्त्या यांचा एकूण गोषवारा वर दिला आहे. त्यावरून कोणत्या हस्तांतरित जमिनी आदिवासींना परत मिळू शकतील याची कल्पना येऊ शकेल. मात्र प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्र अभ्यास करताना वरील गोषवाऱ्यावर अवलंबून न राहता कायद्यातील कलमांचाच आधार घ्यावा लागेल. मात्र त्यासाठी मूळ इंग्रजी दुरुस्त कायदा पाहावा लागेल.

**कायद्याची अंमलबजावणी :**

बरीच वर्षे न्यायालयात गुंतून पडलेल्या या कायद्याची अंमलबजावणी साहजिकच व्यवस्थित होऊ शकली नाही. आदिवासींना त्यांच्या हस्तांतरित जमिनी परत मिळण्याविषयीच्या दोन तरतूदी या कायद्यात आहेत - एकतर जिल्हाधिकाऱ्याला आपण होवून कधीही अशा प्रकरणाची चौकशी केल्यानंतर योग्य वाटल्यास हस्तांतरीत जमीन मूळ मालकाला परत करण्याचा आदेश देता येईल. (कलम ३ ब) ही तरतूद

डोळ्यासमोर ठेवूनच आवश्यक वाटल्यास, सरकार या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विशेष अधिकारी नेमील असे आश्वासन विधानसभेत दिले गेले.

दुसरे म्हणजे ज्याच्या जमिनीचे हस्तांतरण झाले आहे, अशा आदिवासीला अशी जमीन परत करावी असा अर्ज करता येईल. मात्र त्यासाठी तो अशी जमीन स्वत: कसणार आहे अशी हमी अर्जदाराने द्यावयास हवी. असा अर्ज करण्याची मुदत कायदा अंमलात आल्यापासून ३ वर्षे इतकी होती. ही मुदत वाढवून मिळावी अशी कार्यकर्त्यांची मागणी होती. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने नवीन कायदा करून ही मुदत ३ वर्षांऐवजी ३० वर्षे असावी अशी दुरुस्ती केली आहे. **महाराष्ट्र लँन्ड रेव्हिन्यू कोड आणि महाराष्ट्र रिस्टोरेशन ऑफ लॅन्डस टू शेड्यूल्ड ट्राइब्ज (अॅमेंडमेंट) अॅक्ट १९९० (कायदा क्र. १/१९९१):** या कायद्यात आदिवासींच्या जमीन हस्तांतरणाला प्रतिबंध करणाऱ्या आणि बेकायदेशीररित्या हस्तांतरित झालेल्या जमिनी मूळ मालकांना परत करण्याच्या कायद्यातही काही बदल करण्यात आले आहेत. अशा जमिनी परत मिळाव्यात यासाठी करावयाच्या अर्जाची मुदत कायदा अंमलात आल्यापासून २ वर्षे अशी होती ती आता ३० वर्षे अशी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांनी अशा प्रकरणांची चौकशी सुरू केली नसेल तर ती सुरू करण्याचा अधिकार त्यांना देण्यात आला आहे.

**कार्यकर्त्यांपुढील आव्हान :**

आदिवासीच्या जमीनविषयक कायद्यातील या सुधारणांचा फायदा घेऊन आदिवासींच्या हस्तांतरित जमिनी परत मिळाव्यात म्हणून अर्ज करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आदिवासी विभागात प्रचार केला पाहिजे आणि मोठ्या प्रमाणावर असे अर्ज दाखल होतील याविषयी प्रयत्न केले पाहिजेत. कायद्यातील या दुरुस्तीमुळे कार्यकर्त्यांना एक नवी संधी आणि नवे आव्हान मिळाले आहे. याचा जास्तीत जास्त फायदा घेण्याचा प्रयत्न ते करतील अशी आशा आहे.

---

## *भिक्षापात्र*

*तिरकामठ्याविना भटकत आहे,*
*सभ्यताविना बाजारात उभी आहे,*
*आम्हा एकलव्याची जात ।*

*दोन पोयटयांच्या सेणासाठी,*
*गायीच्या मागे धावता धावता,*
*काल, तिलाच सुऱ्यांनी उधळत होती ।*

*गावातील कुत्रे, कावळे,*
*साधुमहाराजा - सारखे गिधाड,*
*सोबतीला होते,*
*आपआपला हिस्सा, इमानदारीने वाटून घेत होते ।*

*गुरुजी, तेव्हा तुम्ही भिक्षापात्र घेवून,*
*गुरुदक्षिणेसाठी उभे होता,*
*पण ठेस लागलेल्या बोटानी इशारा केला,*
*तुम्ही कोणत्याही वेषात आलात तरी,*
*आपआपले अंगुठे शाबित ठेवण्याचा ।*

*तेव्हापासून आमच्या आंधळ्या मनांच्या कल्पनेत,*
*अधिक दिसत आहे,*
*डोळस असलेले गुरुजीसुद्धा,.*
*भिक्षापात्र समोर करतात, एकलव्याला पाहून ...*

-- **एल्. के. मडावी,** अमरावती

# आदिवासी कायदे पुरेसे पुरोगामी नाहीत

लेखक : **रा. वि. भुस्कुटे**

**अ**नुसूचित जमाती शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत. आदिवासींच्या दारिद्र्याचा, अज्ञानाचा, भोळेपणाचा, सरळपणाचा गैरफायदा घेऊन पठारी लोकांनी त्यांच्या जमिनींवर कब्जा केला, अन्याय, अत्याचार, दमदाटी, फसवणूक वगैरे मार्गांचा अवलंब केला. आदिवासींच्या जमिनी बळकावल्या. ब्रिटीशांच्या जमीनविषयक कायद्यामुळे आदिवासी जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया वेगाने सुरु झाली. देशात आदिवासींनी ठिकठिकाणी बंडे केली ती निर्दयपणे चिरडण्यात आली. पण हा प्रश्न संवेदनाशील आहे, हे ब्रिटीशांनी जाणले. आदिवासींमधील असंतोष अंशतः शमविण्यासाठी आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरणास प्रतिबंध करणारे कायदे आदिवासी क्षेत्रासाठी ब्रिटीश सरकारने काही प्रांतांतून केले. उदाहरणार्थ, एजन्सी ट्रॅक्ट इंटरेस्ट अँड लँड ट्रान्सफर ॲक्ट १९१७, छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट १९०८, आसाम रेग्युलेशन पाच १८७३ आणि रेग्युलेशन एक १८८६ वगैरे. आदिवासींचे कल्याण व्हावे म्हणून नाही तर तात्पुरती ठिगळे लावून वेळ मारून न्यायची या ब्रिटीश राजनीतीचा हा भाग होता.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर जी राज्य घटना आपण स्वीकारली त्या घटनेतील अनुच्छेद ४६ मध्ये वर्गीकृत जाती व जमाती यांचा आर्थिक सामाजिक विकास करणे, आणि त्यांचे सामाजिक अन्यायापासून, सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य राहील, असे नमूद केले आहे. या घटनात्मक तरतुदीप्रमाणे आदिवासींच्या जमीन हस्तांतरणावर निर्बंध घालण्यासाठी आणि हस्तांतरीत झालेल्या त्यांच्या जमीनीचा कब्जा पुन्हा आदिवासींना देण्यासाठी भारतातील वेगवेगळ्या राज्यातून १९५६ पासूनच कायदे केले आहेत. त्याचा थोडक्यात आढावा येथे घेणे उपयुक्त ठरेल.

१९१७ चा 'रेग्युलेशन एक' रद्द करून 'आंध्र प्रदेश (शेड्युल्ड एरीया) लॅन्ड ट्रान्सफर रेग्युलेशन, १९५९' करण्यात आला. श्रीकाकुलम, विशाखापट्टम आणि पश्चिम गोदावरी जिल्ह्यातून हा कायदा लागू करण्यात आला. १९६३ च्या 'रेग्युलेशन एक'ने मेहबूबनगर, आदिलाबाद, वरंगल आणि खम्माम या जिल्ह्यातूनही हा कायदा लागू करण्यात आला. या कायद्याच्या प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे आहेत :

अ) अनुसूचित क्षेत्रामध्ये कोणत्याही आदिवासी व्यक्तिने आदिवासी व्यतिरिक्त अन्य व्यक्तिस केलेले जमीन हस्तांतरण अवैध ठरविण्यात आले.

ब) अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींच्या मालकीच्या कोणत्याही जमीनीची कोर्टाच्या डिक्रीने जप्ती किंवा विक्री होणार नाही.

क) आदिवासी व्यतिरिक्त अन्य सदस्यास जर आदिवासीची जमीन हस्तांतरीत केली तर हितसंबंधी व्यक्तिने अर्ज दिल्यानंतर त्या जमिनीचा कब्जा जमीन हस्तांतरिताकडे किंवा त्याच्या वारसाकडे एजंटानी परत द्यावयाचा आहे.

१९७१ च्या सुधारणेने एजन्सी क्षेत्रातील कोणत्याही स्थावर मिळकतीचे हस्तांतरणावर प्रतिबंध घालण्यात येऊन असे जमीन हस्तांतरण अवैध ठरविण्यात आले.

अनुसूचित जाती जमातींच्या जमिनींच्या हस्तांतरणाबाबत संरक्षण देणारे विधेयक १९५६

मध्ये करण्यात आले. विक्री, बक्षिसपत्र, दानपत्र, कब्जा-गहाण वगैरे कोणत्याही प्रकारे जमीन हस्तांतरणास या कायद्याने प्रतिबंध करण्यात आला.

बेकायदेशीर हस्तांतरणाबाबत कलम १७५ प्रमाणे उपाय योजना करता येते. अवैध हस्तांतरणाविरुद्ध दाद मागण्याची मुदत तीन वर्षे होती ती बारा वर्षांपर्यंत वाढविण्यात आली. सार्वजनिक धोरण म्हणून या कायद्याविरुद्ध असलेली आदिवासी जमिनीची हस्तांतरणे नोंद करण्यास प्रतिबंध करण्यात आला हे या कायद्याचे वैशिष्ट्य आहे.

**मध्यप्रदेश :**

मध्यप्रदेश जमीन महसूल संहिता १९५९ चे कलम १६५ (६) नुसार आदिवासी भूमीस्वामीला आपल्या जमिनीवरील हक्काचे जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय हस्तांतरण करता येत नाही. तर कलम १७०(१) नुसार विनापरवाना हस्तांतरणाबाबत कोणत्याही व्यक्तिस दोन वर्षांत उपविभागीय अधिकाऱ्याकडे जमीन कब्जा देवविण्याबद्दल अर्ज करता येतो.

**पश्चिम बंगाल :**

पश्चिम बंगाल जमीन सुधारणा कायदा १९६५ प्रकरण दोन मधील कलम १४(सी) नुसार आदिवासी जमीनधारकास त्याच्या जमिनीचे हस्तांतरण खालील परिस्थितीतच करण्याची मुभा आहे.

अ) आदिवासी जमातीमधील व्यक्तिस मृत्युपत्राने किंवा दानपत्राने,

ब) सरकारला किंवा नोंदणीकृत सहकारी संस्थेला साध्या गहाणाने,

क) सार्वजनिक किंवा दानधर्म करणाऱ्या विश्वस्त संस्थेस विक्रीने

ड) आणि आदिवासी व्यक्तिस किंवा सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीने बिगर आदिवासी व्यक्तिस विक्रीने किंवा अदलाबदलीने.

**ओरिसा**

अनुसूचित क्षेत्रामध्ये सक्षम महसूल अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय स्थावर मिळकतीचे हस्तांतरण रेग्युलेशन दोन १९५६ नुसार अवैध ठरविले आहे. अशाच प्रकारची तरतूद ओरिसा जमीन सुधारणा कायदा १९६० चे कलम २२ व २३ ने केलेली आहे. उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आगाऊ परवानगीशिवाय आदिवासींच्या जमिनीचे कोणतेही हस्तांतरण नोंदण्यास महसूल प्रशासनाच्या नियंत्रणाखालील नोंदणी अधिकाऱ्यांना प्रतिबंध केला आहे. रेग्युलेशन दोन १९५६ मधील खालील सुधारणा १९ डिसेंबर पासून अमलात आल्या आहेत.

एक : आदिवासी व्यक्तिने हस्तांतरीत जमिनीवर आपला हक्क प्रस्थापित करण्याची बारा वर्षांची मुदत वाढवून तीस वर्षे करण्यात आली.

दोन : शेतीसाठी कर्ज मिळविण्यापुरतेच केवळ सहकारी संस्था, सहकारी बँका, अन्य वित्त संस्थांना आदिवासी जमीनींचे हस्तांतरण होण्यास मुभा ठेवली.

तीन : आदिवासी व्यक्तिच्या स्थावर मिळकतीवर अतिक्रमण (ट्रिसपास) करून किंवा अन्य मार्गाने आदिवासीला हुसकावून लावल्यास हे हुसकावणे कायद्यानुसार रद्द ठरवून ती स्थावर मिळकत आदिवासीकडे पुनः प्रस्थापित करायची आहे. तसेच हुसकावून लावणारी व्यक्ति दोन वर्षे पर्यंतच्या कारावासास किंवा रु. २०००/-पर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र ठरते.

**बिहार :**

पाच वर्षे मुदतीच्या साधे गहाणाने होणाऱ्या आदिवासी जमिनीच्या हस्तांतरणास छोटा नागपूर कुळवहिवाट कायदा १९०८ चे कलम ४६ नुसार परवानगी दिलेली होती. १९०९ मध्ये अनुसूचित क्षेत्रासाठी रेग्युलेशन मंजूर करण्यात आला. आदिवासी जमीन हस्तांतरणाबाबतच्या तरतुदी कडक करण्यात आल्या. कलम ४६ चा

भंग करून किंवा फसवणुकीने कोणत्याही जमिनीचे हस्तांतरण केलेली व्यक्ति तसेच अशा हस्तांतरणाची माहिती असूनही या जमिनीचा भोगवटा करणारी व्यक्ति तीन वर्षे पर्यंतचा कारावास किंवा एक हजार रुपयापर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र ठरते. याशिवाय खालील महत्त्वाच्या तरतुदी या रेग्युलेशनने केल्या आहेत.

इंडियन लिमिटेशन ॲक्टमध्ये सुधारणा करून लिमिटेशनची मुदत ३० वर्षांपर्यंत वाढविण्यात आली.

आदिवासी जमिनीबद्दल किंवा स्थावर मिळकतीच्या कब्जाबाबतच्या कोणत्याही दाव्यात डेप्युटी कमिशनर यांना एक पक्षकार बनवण्याचे बंधन घालण्यात आले.

**आसाम :**

जमिनीच्या हस्तांतरणापासून आदिवासींचे रक्षण करण्यासाठी १८८६ च्या रेग्युलेशनमध्ये १९६४ ला सुधारणा करण्यात आली. अनुसूची सहाच्या तरतुदीप्रमाणे बिगर आदिवासीच्या जमीन संपादण्यावर बंधन घालणारे कायदे स्वयंशासित जिल्ह्याच्या जिल्हा कौन्सिलांनी केले आहेत.

**हिमाचल प्रदेश :**

हिमाचल प्रदेश ट्रान्सफर ऑफ लॅंड (रेग्युलेशन) ॲक्ट १९६९ प्रमाणे आदिवासीने बिगर आदिवासीस जमीन हस्तांतरण करण्यावर बंधने घालण्यात आली आहेत.

**मेघालय :**

जमीन हस्तांतरण करणाराने सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी घेतली पाहिजे. अशी तरतूद मेघालय ट्रान्स्फर ऑफ लॅंड (रेग्युलेशन) ॲक्ट १९७१ मध्ये केलेली आहे.

**त्रिपुरा :**

आदिवासींच्या जमीनीबाबतच्या हित-रक्षणासाठी त्रिपुरा जमीन सुधारणा कायदा १९६० मध्ये त्रिपुरा सरकारने केला आहे.

**उत्तर प्रदेश :**

आदिवासींच्या जमीन हस्तांतरणावर १९६० च्या कायदा क्रमांक ४ ने निर्बंध घातले आहेत.

महाराष्ट्र राज्यात आदिवासींच्या हितरक्षणासाठी त्यांच्या जमिनीबाबत कायदे होण्यापूर्वी भारतातील अन्य राज्यातून कायदे करण्यात आले असल्याचे यावरून स्पष्ट होते. महाराष्ट्रातील आदिवासी कायद्यांपेक्षा चांगल्या व परिणामकारक तरतुदी अन्य राज्यातील आदिवासी जमिनींबाबत केलेल्या कायद्यातून आहेत. उदाहरणार्थ :

एक : आदिवासी जमिनींच्या बिगर आदिवासींना होणाऱ्या हस्तांतरणाची नोंदणी अधिकाऱ्याने नोंदच करता कामा नये (राजस्थान, ओरीसा).

दोन : आदिवासी जमिनींबाबत किंवा स्थावर मिळकतीच्या कब्जाबाबतच्या कोणत्याही दाव्यात डेप्युटी कमिशनर यांना एक पक्षकार बनवण्याचे बंधन घालण्यत आले (बिहार).

तीन : हस्तांतरणामुळे जमीन गमावलेल्या आदिवासीला तीस वर्षांच्या कालावधीत दाद मागता येते (ओरिसा, बिहार) आणि

चार : बेकायदेशीर जमिनी हस्तांतरण करणारी किंवा आदिवासीला जमिनीतून हुसकावणारी गुन्हेगार व्यक्ति कारावास किंवा दंडाच्या शिक्षेस पात्र ठरते (ओरिसा व बिहार).

बिहार, ओरिसा, राजस्थान या राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील आदिवासी कायदे परिणाम-कारक नाहीत. पुरेसे पुरोगामी नाहीत असेच म्हणावे लागेल. तेव्हा आदिवासींचे खरेखुरे आर्थिक हितसंबंध रक्षण करण्यासाठी केलेल्या जमीन कायद्याबाबत महाराष्ट्र राज्य कोणत्याही परिस्थितीत अग्रेसर तर नाहीच पण खूप पिछा-डीला आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

# आदिवासी पंचायतीचा न्याय-निवाडा

लेखक : **दिलीप इंगळे**

**सा**तपुडा पर्वताच्या पायथ्याशी वसलेल्या भिल्ल पावरा आदिवासी समाजात वावरत असताना मला ज्या ज्या काही चांगल्या प्रथा, परंपरा बघावयास मिळाल्या त्यातीलच ही अतिशय चांगली समजली जाणारी न्याय-निवाडा प्रथा होय.

जगामध्ये ज्या परंपरा पूर्वजांनी लावून ठेवलेल्या आहेत, त्यातीलच ही एक न्याय-दान पद्धती होय. आजच्या काळी एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाला असल्यास किंवा दोन व्यक्तींमध्ये अथवा दोन कुटुंबांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टीकोनातून काही वाद झाल्यास व तो आपापसात मिटण्यापलीकडचा असल्यास शेवटी त्यांना न्याय मागावयास कोर्टाकडे, पोलीस स्टेशनकडे धाव घ्यावी लागते. काही जण आपापल्या कुटुंबातील प्रमुख व्यक्तीकडे धाव घेतात तर काही समाजातील प्रमुख व्यक्तीकडे न्याय मागावयास जात असतात. अशा अनेक पद्धती आजच्या समाज-जीवनामध्ये प्रचलीत आहेत व या पद्धतीमधील कोर्टाची पायरी चढणे, पोलीस स्टेशनला धाव घेणे यांचा वापर बहुतेक बहुजन समाजात जास्तीत जास्त होताना आढळतो. आदिवासी बांधवांमध्ये असा कोणावर अन्याय झाल्यास अथवा न्याय मागण्याची पाळी आल्यास ते क्वचितच कोर्ट कचेऱ्यात जातात अन्यथा वरील समाजप्रमुख व्यक्तीकडे अन्यायाची दाद मागतात.

साधारणपणे भिल्ल-पावरा बहुसंख्य वस्ती असलेल्या गावामध्ये ही पद्धती प्रचलीत असून तिचा वापर आजही सर्रास होताना आढळतो. या गावामधील एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाला असेल किंवा दोन व्यक्तींमध्ये भांडण होवून ते विकोपाला गेले तर त्यावेळी ज्यावर अन्याय झाला असेल ती व्यक्ती आपल्या गावातील प्रमुख व्यक्तीना पोलीस पाटलाकडे बोलाविते. ह्यामध्ये साधारणतः पोलीस पाटील, सरपंच डायला (कारभारी) व काही मान्यवर व्यक्ती ही सगळी मंडळी एकत्रित जमली तर त्यांना "पंच-मंडळी" असे संबोधन लावण्यात येते. ह्याला एका अर्थाने पंचायत बसविणे असेही म्हणतात. ही सर्व पंच मंडळी एकत्रित जमल्यानंतर भांडणग्रस्त अथवा वादग्रस्त दोन्ही माणसांना बोलावून घेते व बोलविल्यानंतर पंच बसविण्याचे प्रयोजन विचारून मग एकेका पक्षाचे गाऱ्हाणे ऐकून घेतात व दोन्ही पक्षांचे गाऱ्हाणे ऐकल्यानंतर सर्वजण त्यांच्या गुन्ह्याच्या आधारे एकमताने दोषी कोण आहे ते ठरवितात व जी व्यक्ती दोषी असेल व ज्या स्वरुपाचा गुन्हा असेल त्या स्वरुपाची शिक्षा अधिकृतपणे समस्त पंचांसमोर जाहीर करीत असतात.

शिक्षा म्हटली म्हणजे शक्यतो दंड स्वरुपातच असते व ही दंडाची रक्कम संबंधित गुन्ह्याच्या आधारावर अवलंबून असते. लहान स्वरुपाचा गुन्हा असेल तर साधारणपणे १०१/- रु. ते २५१/- रु. पर्यंत आकारला जातो. जरा मोठा अथवा गंभीर स्वरुपाचा गुन्हा असल्यास २५१ रु. ते ५५१ रु. पर्यंत याची आकारणी होत असते व एकदा दंडाची रक्कम जाहीर झाल्यास त्यात कसलाही फेर-फार होत नाही.

पंच बसविण्यामागील कारणामध्ये शक्यतो शेतीवरून आपसात वाद, दारूत शिवीगाळ करणे, विवाहित तरुणीचा विनयभंग करणे, गुन्हा नसताना मारहाण करणे, शेतीमधील पिकांचे नुकसान करणे, गुरांचे नुकसान होणे, विवाह संबंध बिघडले असता घटस्फोट घेणे.

(झगडा मोडणे) किंवा विवाह जोडताना भांडण स्वरुपाचा असल्यास तडजोड घडविणे अशा नानाविध कारणांमुळे पंच बसवून आपल्यावर झालेल्या अन्यायाचे निदान करून घेवून गुन्हेगार व्यक्तीला पंचांकरवी अद्दल घडवित असतात.

पंच मंडळीचा निकाल जाहीर होताच तो संबंधित गुन्हेगार व्यक्तीला मान्य करावाच लागतो मग तो कामदार असो वा आमदार असो किंवा भिकारी असो वा राजा. पंचांच्या कचाट्यातून कोणीच सुटू शकत नाही. दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब होते. एकदा निकाल जाहीर झाल्यानंतर लगेच दंडाची रक्कम वसूल होत असते. संबंधित गुन्हेगार व्यक्तीकडे जर त्यावेळी पैसे नसतील तर अशा वेळी शेत भाड्याने देणे अथवा गहाण ठेवणे, गुरांची विक्री व काहीच मालमत्ता नसल्यास प्रसंगी एखाद्याकडे सालदारी, रोजंदारी कबूल होवून पैसे काढून ते पैसे ताबडतोब भरावे लागतात. एकवेळा सशस्त्र पोलीस पहाऱ्यातून अपराधी पळून जावू शकतो किंवा न्यायालयातील न्यायाधिशांचा निकाल अथवा निर्णय पसंत नसेल तर तो वरील कोर्टाकडे धाव घेवू शकतो. पण ह्या खेडेगावातील खऱ्या-खुऱ्या न्याय निवाड्याच्या कचाट्यातून तो सुटू शकत नाही कारण त्याला त्या गावात समाजात वावरायचे असते. त्यामुळे त्याला मुकाट्याने सर्व काही मान्य करावेच लागते. समजा एखाद्याने संबंधित पंच मंडळींचा निर्णय अमान्य ठरविला तर त्याला गावातून, समाजातून बहिष्कृत करतात. त्यामुळे बहिष्काराच्या भितीने सहसा कोणीही पंचांनी दिलेला निर्णय अमान्य करीत नाही. एखाद्याने निर्णय मान्य असूनही जर दंडाची रक्कम भरली नाही तर त्या व्यक्तीशी कोणीही भांडण करतात, मारठोक करतात. अशा वेळी तो पंचांची मदतही घेवू शकत नाही. त्याचा काही गुन्हा नसताना देखील त्याला इतरांचा अन्याय सहन करावा लागतो. वरील सर्व उदाहरणांमुळे शक्यतो पंचानी दिलेल्या निर्णयाचे पालन अगदी काटेकोरपणे होत असते. अशा तऱ्हेने निरपराध व्यक्तीला योग्य न्याय प्राप्त झाल्याने ह्या समाजातील वादग्रस्त प्रकरणे ही क्वचितच पोलीस स्टेशन अथवा कोर्ट कचेऱ्यापुढे जात असतात.

एखाद्यावेळी जर गावाला त्रास होत असेल म्हणजेच दारुच्या नशेत एखादा शिवीगाळ करीत असेल किंवा गावकऱ्यांना काही त्रास देत असेल तर अशा व्यक्तीला लगेच पंचांच्या बैठकीत बोलावण्यात येवून त्याला दंडरुपी शिक्षा ठोठावण्यात येते. व अशा न्याय निवाड्याच्या प्रसंगी दोन्ही पक्षांचे गाऱ्हाणे ऐकून घेत असतांना पंचांच्या दृष्टीपथात दोन्ही पक्ष समान चुकीला पात्र ठरले तर दोन्ही पक्षांना दंडाची शिक्षा फर्माविण्यात येते. तसेच कमीजास्त स्वरुपाचा गुन्हा असल्यास त्याच स्वरुपात दंड आकारला जात असतो. तसेच निर्दोष आढळलेल्या पक्षावर शिक्षेची कार्यवाही न होता प्रसंगी त्याला नुकसान भरपाईही मिळते.

कोर्टातल्या न्याय-निवाड्यासाठी कोतवाला-पासून ते न्यायाधिशापर्यंत अनेक व्यक्ती असतात व या न्यायदानाच्या मोबदल्यात त्यांना शासन पगार देत असते. तसे काही ह्या निवाड्यात नसते परंतु ही सर्व पंचमंडळी आपापली कामे बाजूला सारून वेळात वेळ काढून उपस्थित असतात. त्यामुळे साहजिकच त्यांना एकत्रित जमल्यानंतर चहा, बिडी, तंबाखू प्रसंगी दारू वगैरे सर्व साहित्य लागते. या साहित्याचा खर्च भागविण्याचा प्रश्न येतो. हा प्रश्न मिळालेल्या दंडाच्या रकमेतून सोडविला जातो. चहापाण्याच्या कार्यक्रमानंतर शक्यतो दारूचा कार्यक्रम असतोच. हा खर्चही दंडाच्या रकमेतूनच वसूल होत असतो. ह्या कार्यक्रमांच्या वस्तूंचा खर्च दंडाच्या रकमेतून वजा करून बाकीची रक्कम पंच मंडळी घेते व त्यांचा विनियोग योग्य वाटेल अशावेळी करतात किंवा समाजकार्यासाठी राखून ठेवतात.

काही निवाड्याप्रसंगी नुकसान भरपाईची फिर्याद असेल, म्हणजेच गुरांचे नुकसान, पिकांचे नुकसान, शेळी, मेंढी, कोंबडी अपहरण किंवा विवाह संबंधातील झगडा अशा विविध नुकसान भरपाईच्या निवाड्याप्रसंगी संबंधित गुन्हेगारांना शिक्षा होवून, ती रक्कम दंड स्वरुपात वसूल होते. त्या रकमेतून चहा, दारूचा खर्च काढून बाकी रक्कम संबंधितास देण्यात येते. अशा प्रकारचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास मी रामपूर गावात राहात असतानाचा प्रसंग बघा. रामपूर गावातच श्री जनार्दन महाराज नावाचे सद्गृहस्थ राहात व ते बऱ्याच वर्षांपासून रामपूर येथेच स्थायिक होते. त्यांची शेती गुरे-ढोरे वगैरे रामपुरलाच होती. त्यामुळे ते रामपुरचेच रहिवासी गणले जात. तसेच १९५२ साली ते आमदार होते व सध्या सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ, धडगांव या संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष आहेत. ह्या संस्थेमार्फत सातपुड्याच्या अतिदुर्गम भागातील पर्वत रांगांमध्येही शिक्षणाची गंगा पोहोचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केलेला आहे व आजही करीत आहेत. त्यांच्या अशा या कार्याचा गौरव म्हणून शासनाने त्यांना 'दलित-मित्र', 'आदिवासी-सेवक' असे अनेक पुरस्कार बहाल करून सन्मानित केलेले आहे. अशी आदरणीय व्यक्ती रामपूरला राहणे म्हणजे रामपूरवासीयांचे खरोखर भाग्य म्हणावयाला हवे, परंतु अशा आदरणीय व्यक्तीला सुद्धा पंचमंडळीच्या न्यायाच्या कचाट्यातून सुटता आले नाही.

महाराजांच्या एक-दोन म्हशी होत्या व त्या म्हशींना गुराख्याबरोबर दररोज रानात चरायला पाठवित असत व त्या गुराख्यांच्या गुरांच्या कळपात इतर लोकांच्याही गाई म्हशी असत. अशी साधारणपणे २५ ते ३० गुरे एका कळपात असत व ही गुरे घेवून गुराखी नेहमी, नियमितपणे सातपुड्याच्या दऱ्या-खोऱ्यामध्ये चरावयास नेत असत.

एके दिवशी असाच तो नेहमीप्रमाणे सर्व म्हशी गरम पाण्याचे झरे असलेल्या 'उनपदेव'च्या डोंगराळ परिसरात घेवून गेला. म्हशी हिरवागार चारा खात आहेत असे पाहून एका झाडाखाली तो बसला. म्हशी त्यांच्या लहरीत मस्तपणे चरत होत्या. चरता चरता त्यांना काय लहर आली कोणास ठाऊक? एकदम दोन म्हशींची टक्कर लागली. त्यामध्ये एक महाराजांची व एक गावातीलच धर्मा वळवी नावाच्या गृहस्थाची होती. त्यांनी जोरात डरकाळ्या दिल्यानंतर लगेच गुराख्याचे लक्ष तिकडे वेधले गेले. सुरुवातीला त्याचे लक्ष गेल्यानंतर दोन म्हशींची टक्कर लागली आहे हे पाहून त्याला मजा वाटली पण त्याच्या चेहऱ्यावरील मजेचा आनंद त्यांचे ते भीषण टक्करीचे तुंबळ युद्ध पाहून क्षणात लोप पावला व हे युद्ध हाताबाहेर होईल ह्या भीतीने लगेच काठी घेवून लढाई सोडविण्यासाठी धावलाही. पण सर्व प्रयत्न व्यर्थ! म्हणतात ना दोन कोंबड्यांची झुंज सोडविणे मुश्कीलच असते व दोन रेड्यांची टक्कर सोडविणे म्हणजे महामुश्कील. तसाच काहीसा प्रकार ह्या म्हशींच्या बाबतीत अनुभवास येत होता. त्या दोन्ही म्हशी प्राणपणाने लढून एकमेकावर मात देण्याचा प्रयत्न करीत होत्या व त्यांचे साधे हातघाईचे टक्करीचे प्रकरण रक्तबंबाळ होणेपर्यंत गेले. मग गुराखी घाबरला. त्याने ताबडतोब मोठमोठ्याने आरोळ्या ठोकून आपल्या जवळपास असलेल्या गुराखी मित्रांना बोलाविले. ते मित्र काठ्या घेवून पुढे सरसावून त्यांची लढाई मोडण्याचा प्रयत्न करीपर्यंत एका म्हशीने दुसऱ्या म्हशीला धडक देवून अणुकुचीदार शिंग खुपसले ते त्या दुसऱ्या म्हशीच्या स्तनाजवळच व तेथून रक्ताच्या धारा सुरु झाल्या होत्या. गुराखी जवळ येण्याच्या आतच महाराजांच्या म्हशीने आपले काम साधून दुसऱ्या म्हशीवर मात केली होती. तेवढ्यात सर्वांनी आरडा-ओरड करून दोघी म्हशींना इतरत्र पळविले व ती लढाई सोडविली. श्री. धर्मा वळवी

यांच्या म्हशीच्या स्तनाजवळच्या जागेतून रक्त वाहात होते. अशा परिस्थितीत त्या गुराख्याने ताबडतोब गुरे घरी नेण्याचे ठरविले व तो घरी घेवून आलाही. सर्व गावात वाऱ्यासारखी बातमी पसरली की म्हशींची भीषण लढाई होवून एक म्हैस पुरती जखमी झालेली आहे व ती बातमी ऐकून बरीच गर्दी जखमी म्हैस बघण्यासाठी येत होती. जो तो संबंधित म्हैस-मालकाजवळ सहानुभूती व्यक्त करीत होता. मलाही ती वार्ता समजली. मीही ताबडतोब त्या ठिकाणी गेलो व बघून चौकशीअंती समजले की, महाराजांच्या म्हशीने शिंगे खुपसून मोठी जखम श्री. धर्मा वळवी यांच्या म्हशीला केलेली होती. संबंधीत गुराख्याने श्री. धर्मा वळवींना जमलेल्या लोकांसमोर सविस्तर हकीकत कथन केली. समोरची म्हशींची अवस्था पाहून तर त्या म्हैस मालकाचे सात गेले व पाचच राहिले कारण सगळ्या गावामध्ये जास्त दूध देणाऱ्या व मोठ्या अशा ज्या काही मोजक्याच दोन-तीन म्हशी होत्या त्यातीलच ती एक होती. त्यामुळे संबंधित माणसांना असे भरपूर उत्पन्न देणाऱ्या म्हशीवर असे प्रचंड संकट आल्यानंतर वाईट वाटणे स्वाभाविकच होते. इकडे हा हा म्हणता ही वार्ता महाराजांच्या कानावरही आली व समजले की आपल्या म्हशीनेच हा भीम पराक्रम केलेला आहे. साहजिकच सहानुभूती ह्या नात्याने तेही श्री. धर्मा वळवी यांचेकडे आले. इतर बघ्यांची गर्दी तिथे होतीच. त्यांनी त्या म्हशीचे दृश्य पाहिल्यानंतर त्यांच्या मनातही करुणा उत्पन्न होवून लगेच त्यांनी एका व्यक्तीला बोलावून सांगितले की, "ताबडतोब गुरांच्या डॉक्टरला घेवून या." हे वाक्य कानी पडताच श्री. धर्मा वळवी म्हणाले की "अगोदर याचा फैसला करून घ्या व मग डॉक्टरला बोलवा." महाराजांना आश्चर्य वाटले की, हा माणूस आपल्याच बैठकीतला असून काय सांगतो आहे? व अगदी खरोखरच होते. कारण दोघेजण समवयस्कच असून नेहमी एकत्रित बसणारे होते व तसेच महत्त्वाचे म्हणजे महाराजांनीच प्रयत्न करून दूध डेअरीतर्फे ती म्हैस कर्जरुपाने श्री. धर्मा वळवी यांना मिळवून दिलेली होती. त्यामुळे त्यांना आश्चर्य वाटणे स्वाभाविकच होते. नंतर त्यांनी जमलेल्या सर्व लोकांना उद्देशून सांगितले की, "माहाले पंच बोहाडलो हाय ताव इ डोबड इखीच रोही!" मला ही गोष्ट ऐकून थोडेसे नवलच वाटले. कारण महाराज सांगत होते की, अगोदर डॉक्टरोपचार करू व मग नंतर काय असेल ते पाहू! पण तसे न होता पंच बसविण्याच्या मुद्यावर महाराजांनाही संगती द्यावी लागली.

थोड्याच वेळात पंचमंडळी बोलावण्यात आली. गुराख्यालाही बोलाविले. त्याच्याकडून पंचांनी सविस्तर हकीकत विचारली. त्यानेही घडलेली हकीकत कथन केली. नंतर दोन्ही पक्षांचे म्हणणे पंचांनी ऐकून घेतले. महाराजांचे म्हणणे होते की, "डॉक्टरोपचाराचा सर्व खर्च मी करून देईन." पण धर्मा वळवींचा त्याला नकार होता. त्यांचे म्हणणे होते की, "मला खर्च ही नको आणि ही म्हैसही नको. मला म्हशीची किंमत भरून पाहिजे." दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर पंच मंडळींनी आपापसात चर्चा करून निर्णय दिला की "म्हैस महाराजांनी ताब्यात घ्यावी व तिच्या किंमतीपोटी ३६००/- रु. श्री. धर्मा वळवी यांना द्यावे."

शेवटी पंचाचा निर्णय तो त्या ठिकाणी गावसाक्ष असल्याने त्याबद्दल कुणालाच शंका व आक्षेप घेण्याचे कारण नसल्याने महाराजांनीही तो निर्णय मान्य केला व ती म्हैस ताब्यात घेवून त्या व्यक्तीला ३६००/-रु. रोख मोजून दिले. त्यांनाच पंचाच्या खर्चासाठी (चहापाणी) पैसे द्यावे लागले. हे सांगणे नकोच. मला तो निर्णय समजल्यावर चमत्कारीकच वाटला पण तो निर्णय ह्या भागातील प्रथेप्रमाणे बरोबर आहे असे लोकांकडून समजल्याने व वरील निवाडा खरोखर निकोप झाला असल्याचे समजल्यावर मला तेव्हा ही गोष्ट पटली.

वरील उदाहरणावरून आपणास दिसेल की ह्या आदिवासी पंचायतीच्या न्याय-निवाड्यासमोर अगदी नि:पक्षपातीपणे बिना लाचलुचपत निर्णय दिला जातो. त्यात अगदी खरोखरच गरीब/श्रीमंत भेदभाव पाहिला जात नाही. दोषी व्यक्ती न्यायाच्या कचाट्यातून सुटून जावू शकत नाही व सध्या प्रचलीत असलेल्या न्याय-पद्धतीमध्ये गुन्हेगार सहीसलामत सुटून जावू शकतो. तसे ह्या न्याय-निवाड्यात होत नसल्याने निर्दोष माणसाला काहीही खर्च न करता गावातच योग्य तो न्याय मिळून गुन्हेगारास योग्य शिक्षा गावातील लोकांसमोरच होत असल्याने तसल्या प्रकारचे गुन्हे घडण्यास ह्या निवाड्यापासून बोध मिळून पुष्कळ प्रमाणावर आळा बसण्यास मदत होत असते.

म्हणूनच आज समाजामध्ये प्रचलीत असलेल्या व 'अन्धा-कानून' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या न्यायालयातील न्याय व्यवस्थेपेक्षा बिना पैशाची, लाच-लुचपत न चालणारी, न्यायात भेदभाव न पाहाणारी, भ्रष्टाचार न येवू देणारी व निर्दोष व्यक्तीला योग्य तो न्याय देवून दोषी व्यक्तीला योग्य ते शासन देणारी, तेही कोणत्याही दबावाला बळी न पडता योग्य असा न्याय देणारी, आदिवासी बांधवांची ही 'पंच-मंडळी' 'न्याय-निवाडा' पद्धतीला आदर्श न्याय-निवाडा पद्धत म्हटल्यास वावगे ठरू नये!

---

## वाटते मजला

*वाटते मजला होऊन फुल गुलाबाचे*
*मने लोकांची करावी आकर्षीत*
*पसरवावा सुगंध सगळीकडे*
*रहावे डौलाने तरुणीच्या केसात ।*

*वाटते मजला होऊन फुलपाखरू*
*कळ्या फुलांवरती बागडावे*
*पकडणाऱ्यांशी खेळावे लपाछपी*
*चुकवून त्यांना उडून जावे ।*

*वाटते मजला होऊन मासा*
*उड्या मारून खेळावे लहरींशी*
*गुदगुल्यांचा खेळ खेळावा*
*उभे पाण्यात राहणाऱ्यांशी ।*

*वाटते मजला होऊन चातक पक्षी*
*जुळवावे नाते धरतीचे गगनाशी*
*मारुनी आकाशी उंच भरारी*
*गोष्टी कराव्या रविकिरणांशी ।*

**--जीवन गेडाम**

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणाचा अहवाल :

लेखक : **रंजना कान्हेरे**

सरकारी पातळीवर नेहमीच 'गावोगाव शाळा आहेत. प्राथमिक शिक्षणात वेगवेगळ्या सोयी-सवलती मुलाना दिल्या आहेत.' अशा प्रकारचा प्रचार चालतो. खेड्यापाड्यातून मजुरीवर जगणाऱ्या आदिवासी लोकांपर्यंत हे शिक्षण कितपत पोचते या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न म्हणजे हा प्रस्तुतचा अभ्यास आहे.

धुळे जिल्ह्यातील शहादा तालुक्यात सपाटीवर असलेली बहुतेक गावे शेतमजुरीवर जगणाऱ्या आदिवासी समाजाची मोठ्या प्रमाणावर वस्ती असलेली अशी आहेत. तशा गावोगावी जिल्हा परिषद शाळा आहेत. पण सरकारी किंवा संस्थेच्या आश्रमशाळा या भागात अभावानेच आढळतात. तालुक्यात ज्या आश्रमशाळा आहेत त्या डोंगराजवळच्या शेतकरी असलेल्या आदिवासी भागात आहेत. सपाटीवरच्या शेतमजूर आदिवासींमध्ये शिकलेले तरुण फारसे दिसत नाहीत. त्यामुळे शाळेत एखाद दुसरे वर्ष काढणारी व त्यानंतर काही कारणानी गळणारी अशी मुले जास्त प्रमाणात असावीत असा अंदाज बांधून या मुलांचे प्रमाण किती आहे, शाळेत बाहेर पडायला त्याना भाग पाडणारी अशी कोणकोणती कारणे आहेत याचा तपास घेण्यासाठी म्हणून शहादा तालुक्यातील तीन गावे निवडली ती म्हणजे- १) कुरंगी २) धुरखेडा ३) शिरूड आणि याचबरोबर शहादा शहरातील एका आदिवासी वस्तीचाही तुलनेसाठी अभ्यास केला.

ही गावे मिश्र वस्तीची आहेत. त्यातील कुरंगी या गावात कोळी व दलितांची काही घरे सोडल्यास बाकी सर्व भिल व पावरा या आदिवासी जमातीच्या लोकांची आहेत. पावरा आदिवासींची घरेही तशी कमीच आहेत. म्हणजे गावात भिल बहुसंख्य आहेत. पावरांची आर्थिक परिस्थिती तुलनात्मकदृष्ट्या चांगली आहे. याच्या परिणामी त्यांच्या मुलांचे शिक्षणही चांगल्या प्रकारे झालेले दिसते. कुरंगीमधील भिल लोकांमध्ये भूमीहीन ५-६ च घरे आहेत. पण बाकीच्यांकडे थोडीफार शेती असली तरी त्यांचे जगण्यासाठीचे मुख्य उत्पन्न मजुरी हेच आहे. जमिनीबाबत शिरूडमध्ये बरोबर याउलट परिस्थिती आहे. तिथे शेती असलेली अशी ५-६ च घरे आहेत. बाकीचे भूमीहीन आहेत. पण शेतीवाल्यांनाही मजुरी करावी लागतेच. धुरखेड्यातील पूर्ण आदिवासी वस्तीच भूमीहीन शेतमजूर आहे. प्रत्येक गावात दोन किंवा तीन घरी दुकान / चक्की असे जादा उत्पन्न मिळते. शहादा शहरातील वस्तीतही सर्व भूमीहीन शेतमजूरच आहेत.

तीनही गावातील आदिवासी घरांची संख्या दोनशेच्या आतबाहेर आहे. यातील ६ ते १६ वर्षे वयोगटातील मुले असलेली घरे सर्व्हेसाठी निवडली आहेत. धुरखेड्यातील वीसएक घरे मजुरीसाठी गाव सोडून काही महिन्यांसाठी गुजराथेत गेल्यामुळे त्यांची माहिती मिळू शकली नाही.

**सर्व्हेत मिळालेली माहिती :**

प्रत्यक्ष सर्व्हेमध्ये असे दिसून आले की एकूण मुलांपैकी ६८.३१% मुले शाळेशी बिलकूल संबंधच आला नाही अशी आहेत. जी जातात त्यातली ४६.९१% मुले गळलेली आहेत. म्हणजे एकूण ८३.१८% मुले ही आता शाळेत न जाणारी अशी आहेत. या गळतीच्या कारणापैकी सर्वात जास्त मुले ज्यामुळे गळतात ते कारण म्हणजे

त्यांनाच शिक्षणाबद्दल दुरावा उत्पन्न झाल्याचे आहे. शाळा, शिक्षण याबद्दल मुलांमुलींना रस वाटणे, त्यांच्या कुतुहलाला, उत्सुकतेला खाद्य पुरवून त्यांची बौद्धीक भूक भागवणारे वातावरण शाळेत नसते. उलट शाळेच्या वातावरणात असलेला उत्साह मारलाच जातो असे दिसते. शाळेतून गळणाऱ्यांमध्ये शाळेला कंटाळून स्वतःहून शाळा सोडणाऱ्यांचे प्रमाण जवळजवळ निम्मे आहे. या मागोमाग घर व लहान भावंडे सांभाळणे, बकऱ्या गुरे चारणे तसेच मजुरीसाठी म्हणून शाळा सोडणारेही मोठ्या प्रमाणात आहेत. शिक्षक नीट शिकवत नाही, शिक्षक मार देतात, पाटी-पुस्तकांसाठी पैसे नसणे अशा इतरांच्या तक्रारी शाळा सोडण्यामागे आहेत. आजारपण हेही एक कारण आहे. एका मुलीने बरोबरच्या मुली शाळेत येत नाहीत म्हणून एकटी जायला लाजून शाळा सोडली तर एका एकुलत्या मुलाला मुंजा धरून नेईल या भीतीने त्याच्या आजीने शाळेत पाठवले नाही. चौथीनंतर इंग्लीश भाषा जड गेल्याने तसेच आश्रमशाळेत नंबर लागला नाही म्हणूनही कोणी घरी राहिले. मुले पळवून नेणारी टोळी फिरत असल्याच्या भीतीमुळेही दोन मुलींना त्यांच्या आईवडीलांनी आश्रमशाळेत नंबर लागूनही पाठवले नाही.

गावातून फिरताना, लोकांशी बोलताना, आपल्या मुलामुलींना शिकायला मिळाले पाहिजे ही गरज त्याना तीव्रतेने जाणवत आहे असे अनुभवास येत होते. पण आपल्या अपुऱ्या मजुरीवर शिकणाऱ्या मुलांना पाटी, पुस्तके, कपडे घेऊन द्यायला आपण असमर्थ आहोत हे दुःखही बाहेर पडत होते. सरकारने स्वतः या सर्वांची जबाबदारी घेऊन आपल्या मुलांसाठी नवीन आश्रमशाळा उघडल्या पाहिजेत अशी त्यांची मागणी होती. खरं तर ही मागणी घेऊन शिकण्याची इच्छा असलेल्या ३०० मुले-मुली यांचा एक मोर्चा या भागातील आदिवासी शेतमजुरांची संघटनेने - 'श्रमिक संघटने'ने आधीच काढला होता आणि या गावातील मुले व पालक त्यात सामीलही झाले होते.

मुलांना शाळेत घालायचे तर पालकांना तावडतोबीने काही फायदा नाही हे तर दिसत असतेच. आणि उलट मुलांच्या पाटी, पुस्तक, कपडे इत्यादीसाठी सतत होणारा खर्चही डोळ्यांसमोर येतो. एका बाजूला हा तोटाच दिसतो आणि त्याच्यासमोर मुलगा/मुलगी मजुरीला जाऊ लागली तर होणारा फायदाही जास्त दिसतो. घरात लहान भावंडे असतील तर आईवडील मजुरीला आणि धाकट्यांना सांभाळत मोठे मूल घरी हे तर खेड्यातून सर्रास दिसणारे दृश्य आहे. गाई-बकऱ्यांमधली संपत्ती वाढण्यासाठी, त्यांची देखभाल करणे गरजेचे असते आणि घरातले थोडी समज आलेल्या वयातले मूल या कामासाठी जुंपले जाते.

ज्यांच्या घरातली मुले थोडंफार शिक्षण घेण्यामागे आहेत त्यांना पुढचे सुशिक्षित बेकारीचे संकट हे आताच वाकुल्या दाखवायला लागले आहे. धुरखेडा गावातल्या एका बाईने हे बोलून दाखवलेच - "मुले शिकून पुढे काय करणार हो? गावात शिकलेली दोनतीन मुले बेकार आहेत. त्याना काही कामधंदा मिळतो का पहा?" असे ती म्हणाली. या शिकलेली मुले घरी राहाण्यातूनही इतरांवर परिणाम होतोच. आणि शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी या प्रश्नावर लक्ष देण्याचीही गरज आहे.

समाजात आदिवासींना जे दुय्यम स्थान दिले जाते त्याचा परिणामही शाळेतल्या वातावरणावर होतो. शाळेत इतर समाजातील मुलांपुढे मिळणारे दुय्यमत्वही आदिवासी मुलांचा उत्साह मारून टाकते. "शाळेत बाकीची मुले इतकी भरलेली असतात की आमच्या मुलांना तिथे कुठे जागा मिळेल? आमच्या मुलांसाठी वेगळी आश्रमशाळाच पाहिजे." या एका बाईच्या उद्‌गारात अप्रत्यक्षपणे हे दुय्यम लेखले जाण्याचे दुःखच लपलेले दिसते.

ही केवळ तीनच गावांची परिस्थिती नाही. त्या भागातील इतर अनेक गावांचे हे प्रातिनिधीक स्वरूप आहे. केवळ प्राथमिक शिक्षण मिळण्याच्या बाबतीत ही परिस्थिती आहे. पुढच्या शिक्षणाची सोय होणे दूरच.

शहादा शहरातील आदिवासी वस्तीचीही काही वेगळी परिस्थिती दिसत नाही. तिथे एका शिक्षकांनी मुलांना शिकवण्यासाठी आर्थिक मदत लोकांकडून गोळा करून खास प्रयत्न केले. पण याच्या परिणामी शिक्षण अर्धवट सोडून देणाऱ्या मुलांचे प्रमाण जास्त आहे. आणि या सोडून देण्यामागची कारणे वरील गावांसारखीच आहेत.

आज समाजातील साक्षरता वाढवण्याचे प्रयत्न खूप जोरात चाललेत असे जे वरवर भासते त्या मागची दडलेली खरी परिस्थिती ही अशी भयानक आहे. प्रौढांची साक्षरता तर दूरच राहिली पण जी मुले-मुली शिकण्याच्या उमेदीच्या वयात आहेत त्यांनाच वर दिलेल्या वेगवेगळ्या कारणांमुळे शाळेच्या जवळपासही फिरकायला मिळत नाही आणि घरच्या दोन वेळच्या जेवणाच्या सोयीसाठीच ज्याना दिवसभर घाम गाळावा लागत आहे, त्या आईवडिलांना मनात असले तरी मुलांना शाळेत पाठवणे जमत नाही ही परिस्थिती आहे.

या सर्व मुलामुलींच्या शिक्षणाची सोय होण्यासाठी सरकारी पातळीवरच मोठ्या प्रमाणावर लक्ष घातले जाण्याची आणि कार्यवाही होण्याची गरज आहे.

## *जीवन*

*मनाच्या झाल्या चिंधड्या चिंधड्या*
*पाहून मृत्युचा थयथय नाच*
*कुणा न कळे नियतीची चाहूल*
*जीवन म्हणजे नुसती काच*

*मरणाला न लागे कारण*
*कधी भूकबळी कधी नरबळी*
*मरण झाले आहे स्वस्त*
*कधी चमके फक्त सोनसळी*

*भुकेपायी जीव कळवळतात*
*अन्नान्न होऊनी दशदिशा*
*माणसांची गांडुळे वळवळतात*
*ठेवूनी फक्त मातीची आशा*

*कुठे उत्तुंग बंगल्यांच्या दाटीत*
*झोपडपट्टीचे मधेच खरकटे*
*पण मानवता तिथेच आढळेल*
*असे मनास उगीच वाटे*

**-- सौ. कांचन बोंबले,** गडचिरोली

# सातपुड्यातील आदिवासींच्या विकासाच्या माझ्या कल्पना

लेखक : **प्रा. एस. पी. गिरासे**

सातपुड्याच्या परिसरात अक्कलकुवा, धडगाव, तळोदा, शहादा, शिरपूर, चोपडा या तालुक्यांचा प्रामुख्याने समावेश होतो. या तालुक्यामध्ये सरासरी ७० टक्के लोकसंख्या ही आदिवासी आहे. मी १९ वर्षांपासून सातपुडा परिसरात नोकरी करीत आहे. या भागातील आदिवासींचा वेळोवेळी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध आला. यात दिसून आले की, वर्तमानपत्रात व सरकारी अहवालातून माहिती प्रसिद्ध केली गेली व केली जात आहे, ती बरीच सत्य आहे. आमचे शासन वेगवेगळ्या योजना आखून या आदिवासी बांधवांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रगती साधण्याचा प्रयत्न करीत आहे. आदिवासी बांधवांना जास्तीत जास्त सुखी करण्यासाठी अनेक क्रांतीशील योजना आखल्यात व अमलात आल्यात. परंतु या योजनांचा फायदा किती प्रमाणात आमच्या आदिवासी बांधवांना झाला? हा संशोधनाचा विषय होईल.

आमच्या आदिवासी बांधवांचा विकास व त्यांचे जीवन अधिक सुखी-समाधानी करावयाचे असेल तर आर्थिक प्रगतीशिवाय सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रगतीला वेग मिळणे शक्य नाही, हे सर्वमान्य झाले आहे. आणीबाणीच्या काळात आदिवासी जनतेला कर्जमुक्त करण्यासाठी अनेक उपाय योजलेत. सुधारलेल्या समाजाकडून आदिवासींच्या शेतजमिनी परत घेऊन आदिवासींना वाटाव्यात ही योजना फारच योग्य होती. त्याचा फायदा आजच्या बऱ्याच आदिवासी बांधवांना मिळाला आहे. या मागे आमच्या शासनाचा फायदा असा की, आदिवासींच्या हातात उत्पादनाची साधने येतील व त्यांच्याकडून उत्पादन करवून घेता येईल त्यामुळे त्यांची आर्थिक प्रगती होईल व आर्थिक विषमता कमी होईल. फक्त उत्पादनाची साधनेच दिली म्हणजे उत्पादन वाढेल काय? आजची शेती भांडवलाशिवाय शक्य नाही व शेती व्यवसाय आधुनिक ज्ञानाशिवाय शक्य आहे काय? त्यांना कर्जरुपाने भांडवल पुरविले जाते. परंतु त्याच्या जोडीला आवश्यक असणारे शेतीचे तांत्रिक ज्ञान आहे काय? त्यासाठी आदिवासी तरुण पिढीला अद्ययावत शेती शिक्षण दिले पाहिजे. शेतकी शाळा व शेतकी कॉलेजांनी आदिवासी भाग दत्तक घेतले पाहिजेत व याद्वारे आधुनिक शेतीचे तांत्रिक ज्ञान आदिवासी बांधवांना दिले पाहिजे.

**सहकारी कागद उद्योग :**

सातपुडा पर्वतावर अमाप नैसर्गिक साधनसामुग्री आहे. त्यांचा पुरेपुर फायदा घेण्याच्या दृष्टीकोनातून या भागात कागद कारखाने काढावेत. या भागात कागद कारखान्याला आवश्यक असा स्वस्त कच्चा माल गवत, बांबू व वनस्पती पाने उपलब्ध होऊ शकतील. देशाला असणाऱ्या अपुऱ्या कागदाच्या पुरवठ्यात भर पडेल व आदिवासी जनतेला रोजगार मिळेल.

**दुग्ध व्यवसाय :**

धुळे जिल्हा दूध पुरवठा करण्याच्या बाबतीत अग्रेसर समजला जातो. या आदिवासी भागात गुरांना अत्यावश्यक असणारा चारा-गवत मुबलक प्रमाणात स्वस्त उपलब्ध होऊ शकेल. आदिवासींना रोख स्वरुपात कर्ज पुरवठा न करता गाई, म्हशींच्या स्वरुपात कर्ज पुरवठा करावा म्हणजे त्यांना त्यांचा मोठ्या प्रमाणात दुधाच्या स्वरुपात मोबदला मिळेल. दुधाला बाजारपेठ

मिळावी म्हणून सहकारी तत्त्वावर दूध सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन द्यावे. यामुळे आदिवासी बांधवांना काम मिळेल व त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

**मच्छीमारी व्यवसाय :**

या सर्व तालुक्यांजवळून तापी नदी वाहते. नदीला वर्षभर भरपूर पाणी असते. त्यामुळे मच्छीमारी हा व्यवसाय वर्षभर चालू शकेल. आदिवासी बांधवांचा मच्छीमारी हा उपजत व्यवसाय आहे. त्यासाठी आधुनिक मच्छीमारी होड्या व इतर साधने पुरवून सहकारी तत्त्वावर मच्छीमारी सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेल.

**सहकारी तत्त्वावर सॉ मिल्स् :**

सातपुडा जंगल जवळच असल्याकारणाने मोठ्या प्रमाणावर लाकूड उपलब्ध आहे. लाकडाचा उपयोग इमारती कामासाठी आणि इतर महत्त्वाच्या कामासाठी होतो. ते कापण्यासाठी सहकारी तत्त्वावर सरकारने सॉ मिल्स उभारण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे आदिवासींना रोजगार मिळेल व कमी खर्चात इमारती लाकूड उपलब्ध होऊ शकेल.

**गवतावर प्रक्रिया करणारे उद्योग :**

सातपुड्यात मोठ्या प्रमाणात गवत उपलब्ध आहे. त्याचा उपयोग करता यावा म्हणून गवत कापून त्याला मार्केट मिळावे म्हणून गवताच्या गाठी बांधण्याचा व्यवसाय स्थापन करावा. त्यामुळे आदिवासी बांधवांना त्यांच्या आवडीचे काम उपलब्ध होऊ शकेल. रोशा गवतापासून तेल तयार करता येते. अशा गवताचा शोध घेऊन तेल तयार करण्याचा व्यवसाय सरकारने स्थापन करावा किंवा खाजगी व्यक्तींना तसे प्रोत्साहन द्यावे.

**सहकारी साखर उद्योग :**

जवळ जवळ या सर्वच तालुक्यात ऊस मोठ्या प्रमाणात मिळू शकेल अशी जमीन लाभली आहे. त्याचा फायदा घेऊन सरकारने स्वतः भांडवल उभारून किंवा आदिवासींना सहकारी तत्त्वावर साखर कारखाना स्थापन करण्यास प्रोत्साहन देऊन आदिवासींना रोजगार मिळवून देऊन त्यांच्या उत्पन्नात भर घातली पाहिजे.

**आदिवासी तरुणांना नेतृत्व प्रशिक्षण :**

आदिवासी समाजाच्या समस्या कोणत्या? त्या सोडविण्यासाठी शासकीय योजना कोणत्या आहेत? त्या योजनांचा प्रचार आणि प्रसार कसा करावा? आदिवासी समाजातील अनिष्ट चालीरीती, अंधश्रद्धा व दुर्गुण कोणते आहेत? ते दूर करण्यासाठी काय करावे? या संदर्भातील नेतृत्व जागृत करण्यासाठी आदिवासी तरुणांना नेतृत्वाचे प्रशिक्षण द्यावे. आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी नेतृत्व जागृत करणे काळाची गरज आहे. शाहू समाजापेक्षाही ढोंगी, लबाड आणि स्वार्थी आदिवासी कार्यकर्ते आदिवासी समाजाची कशी दिशाभूल आणि फसवणूक करतात याची स्पष्ट माहिती प्रशिक्षणार्थींना देण्यात यावी.

**वनखात्यात आदिवासी तरुणांना प्राधान्य :**

सातपुड्याच्या परिसरात जंगलांचे रक्षण व देखभाल करण्यासाठी सरकारने वन-विभागाचा व्याप वाढविला आहे. त्यात नोकर घेतले जातात त्यावेळी जास्तीत जास्त आदिवासींना प्राधान्य दिले पाहिजे, कारण त्यांना जंगलाची संपूर्ण माहिती असते. त्यांच्या ज्ञानाचा फायदा घेता येईल व त्यांना रोजगार मिळू शकेल.

**उपजत ज्ञान आणि गुण :**

आदिवासींना काही उपजत ज्ञान आहे. बांबूपासून चटया करणे, पाट्या बनविणे, बासरी तयार करणे इ. व्यवसायांना प्रोत्साहन दिले पाहिजे व त्याला मार्केट मिळेल अशी व्यवस्था शासनाने केली पाहिजे. त्यांना संगीत, कला, नृत्य कलाही अवगत आहे. त्या कलेची जोपासना झाली

पाहिजे व तिचा उपयोग वेगवेगळ्या क्षेत्रांत घेतला पाहिजे. औषधी वनस्पतींचे ज्ञान म्हाताऱ्या वयस्कर व्यक्तिंना अजूनही आहे. त्याचा फायदा घेतला गेला पाहिजे. त्यासाठी वन-औषधी संशोधन केंद्र स्थापन केले पाहिजे आणि त्यांच्या ज्ञानाचा योग्य तो मोबदला दिला पाहिजे.

**आदिवासी उपयोजनेतील दोष आणि पळवाटा :**

आदिवासींचा सर्वांगिण विकास करण्यासाठी आदिवासी उपयोजना स्थापन झाली आहे. खरोखरच ही योजना आदिवासींच्या हिताची आहे. त्यात काही अभाव व दोष आहेत ते दूर केले पाहिजेत. तिचे कार्य कार्यक्षम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षण व आर्थिक प्रगतीचा तसा जवळचा संबंध आहे. शिक्षणाची प्रगती झाली तर निश्चितच आर्थिक प्रगतीत भर पडेल. त्यासाठी आदिवासी बांधवांना तांत्रिक व इतर ज्ञान दिले तर शिक्षणापासून मिळणाऱ्या पदवीच्या आधारे रोजगार मिळू शकेल. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाला पाहिजे. प्रत्येक तालुक्यात मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह व ग्रामीण भागात आश्रमशाळा स्थापन झाल्या पाहिजेत. शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपाय योजले पाहिजेत.

**वनस्पतींवर प्रक्रियात्मक लघु उद्योग :**

या भागात लाभलेली लहान मोठी नैसर्गिक साधन संपत्ती उदा. डिंक, लाख, महुची फुले व तेलबिया यांचा पुरेपूर उपयोग घेता येईल. यासाठी कोणते लघु व्यवसाय सुरू करता येतील याचा शोध शासनाने घेतला पाहिजे. आदिवासी शिक्षीत तरुणांना लघु व्यवसाय स्थापन करण्यात सर्व परीने मदत करून प्रोत्साहन द्यावे.

**रस्ते आणि वाहतुकीची साधने :**

आदिवासी तालुक्याची प्रगती होण्यात येणारे अडथळे म्हणजे वाहतुकीसाठी अयोग्य व आजारी रस्ते, अपुरी वाहतुकीची साधने व सोयी. शासनाने या अडचणी सोडविल्या पाहिजेत.

**शासकीय योजनांचा प्रचार आणि प्रसार :**

आदिवासी बांधवांचा आळशीपणा, भविष्याबद्दल बेपर्वाई व सरकारी योजनांबद्दल अविश्वास इ. दुर्गुण दूर करण्याचा प्रयत्न शिक्षित आदिवासी बांधवांनी केला पाहिजे. आपल्या प्रगतीसाठी शासनाने कोणत्या योजना आखल्या आहेत त्याचा उद्देश काय? इ. सांगून योजनेच्या बाबतीत त्यांच्याबद्दल विश्वास वाढविला पाहिजे.

**तांत्रिक शिक्षणाची सोय :**

प्रत्येक तालुक्यात किंवा दोन तालुके मिळून आदिवासी विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञान देता यावे यासाठी आय.टी.आय. या सारखे लहान लहान कोर्सेस सुरू करावेत. त्याचा फायदा आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर रोजगार मिळण्यास होईल. आदिवासी विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घेतला पाहिजे. त्यांनी जागृत झाले पाहिजे. मला येथे उल्लेख करावासा वाटतो की, शहादा येथे आय.टी.आय. चा व्होकेशनल कोर्स सुरू केला होता तो पुरेशा आदिवासी विद्यार्थ्यांच्या अभावी चालविणे त्रासाचे झाले.

**आदिवासी मजुरांना न्याय :**

आदिवासी भागात असलेले लहान शेतकरी आदिवासींना कमी मजुरी देऊन छळतात, पिळवणूक करतात अशा तक्रारी केल्या जातात. या बाबतीत मला सांगावेसे वाटते की, या भागातील शेतीमध्ये अतिवृष्टीमुळे, रोगराईमुळे व असुरक्षिततेमुळे निश्चित स्वरुपाचे उत्पन्न मिळू शकत नाही. त्यामुळे उत्पन्नाचे प्रमाण कमी असल्या कारणाने कमी मजुरी दिली जाते. मात्र आज मजुरी रास्त दराने दिली जाते असे वाटते. शेतकऱ्यांनी सुद्धा आदिवासींना या बाबतीत न्याय मिळवून देण्यास हातभार लावावा.

**खाजगी उद्योजकांना प्रोत्साहन :**

सातपुड्याच्या पायथ्याशी ज्या खाजगी व्यक्ती किंवा संस्था कागद कारखाने, दूध डेअरी, सॉ-मिल्स किंवा किरकोळ जंगल संपत्तीवर

आधारीत उद्योग करू इच्छितात त्यांना योग्य सवलती देऊन प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे आदिवासींना रोजगार मिळू शकेल.

आणीबाणीच्या काळात करोडो रुपये या तालुक्यामध्ये आदिवासी बांधवांच्या प्रगतीसाठी खर्च केलेत असे सांगितले जाते. या सर्व रकमेचा फायदा आदिवासींना मिळाला काय हा महत्वाचा प्रश्न आहे. करोडो रुपये वाटल्याने आदिवासी जनतेचे दारिद्रय दूर होईल काय? खचीतच नाही. यापेक्षा करोडो रुपये गुंतवणूक करून या भागात सरकारने नैसर्गिक संपत्तीवर आधारीत कागद कारखाने, डिंकापासून रसायन करणे, सॉ मिल्स उभारणे व महुच्या फुलांपासून दारू व औषधे तयार करणे, (पूर्वी धडगांवला दारू गाळण्याचा प्रकल्प होता.) अशा स्वरुपात प्रकल्प उभारून आदिवासी बांधवांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून द्यावा. त्यात राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेलच.

**आदिवासी संशोधन केंद्राची शाळा :**

सातपुड्याच्या पायथ्याशी/जवळच आदिवासी संशोधन केंद्राची शाळा स्थापन करून आदिवासी बांधवांचा सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनपद्धतीचा अभ्यास केला पाहिजे. सामाजिक-सांस्कृतिक जीवनातील आदर्श मूल्यांची जोपासना आणि अयोग्य बाबींचे निर्मूलन करण्याची भूमिका या केंद्राने स्वीकारली पाहिजे. आदिवासी बांधवांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाला विधायक दिशा देण्यासाठी संशोधनाची गरज आहे.

**अंधश्रद्धा निर्मूलन :**

आदिवासी समाज सनातनी प्रवृत्तीचा आहे. रूढी आणि परंपरेने आदिवासी समाजात अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा दिसून येतात. अंधश्रद्धेचा पगडा असल्यामुळे भुताटकी, जादू-टोणा व भगतगिरी इ. प्रकार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आधुनिक औषधोपचारांवर त्यांचा विश्वास बसत नाही. अंधश्रद्धेमुळे पुरोगामी दृष्टीकोनाचा अभाव जाणवतो त्यामुळे श्याम मानव सारख्या महामानवाचा उपयोग या भागात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी शासकीय स्तरावर तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीनी या संदर्भात पुढाकार घेवून करावा.

**व्यसनमुक्तीची मोहीम :**

आदिवासी बांधवांना अनेक प्रकारची व्यसने दिसून येतात.

उदा. - दारू, गांजा, अफू, बिडी आणि तंबाखू इ. अनेक व्यसनांमुळे आर्थिक आणि शारीरिक दुर्बलता प्राप्त होते. यास्तव शासनाने आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेवून व्यसनमुक्तीची मोहीम राबवावी आणि आदिवासी समाज व्यसनमुक्त करावा.

**आश्रमशाळा :**

सातपुडा परिसरातील आदिवासी मुलामुलींना शिक्षणाची गोडी लागावी यासाठी आश्रमशाळा फारच महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत. अस्तित्वात असलेल्या आश्रमशाळा संख्येने फारच मर्यादित असून अनेक गैरसोयीनी बेजार आहेत. त्यामुळे शासकीय स्तरावर पाहणी करून आश्रमशाळांची संख्यात्मक आणि गुणात्मक विकासाची योजना आखावी. आदिवासींच्या शैक्षणिक विकासांना वरदान ठरणाऱ्या आश्रम शाळांचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास घडवून आणावा.

**शासकीय वसतिगृह :**

आर्थिक मागासलेपणामुळे आदिवासी तरुण आणि तरुणी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. यास्तव आदिवासी मुला-मुलींसाठी शासकीय वसतीगृह आहेत. वसतीगृहाची संख्या मर्यादित असल्यामुळे शासनाने आदिवासी मुलामलींसाठी सर्व सोयीयुक्त अद्यावत वसतीगृहे उभारावीत.

**कुटुंब नियोजन :**

राष्ट्रीय पातळीवर राबविल्या जाणाऱ्या कुटुंब नियोजन योजनेचा फायदा आमच्या आदिवासी बांधवांनी घेतला नाही असे म्हणतात. महत्त्वाची योजना आदिवासी भागात यशस्वीरित्या राबविली जावी, यासाठी समाजातील शिक्षित तरुणांनी मदत केली पाहिजे. तसेच आदिवासी बांधवांनी शिक्षणाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. यासाठी अनेक उपाययोजना सरकारने जाहीर केलेल्या आहेत. त्या योजनांचा ज्यांनी फायदा घेतला अशा शिक्षित आदिवासी बांधवांनी इतरांना त्या योजना समजावून दिल्या पाहिजेत. आपल्यावर समाजाचे ऋण आहे व ते फेडण्याची आपली जबाबदारी आहे. त्याची जाणीव त्यांनी ठेवली पाहिजे.

---

## *नव्या युगांचे वादळ !*

*राखीतला निखारा आता*
*फुलू लागला आहे*
*गतकाळाची होळी आता*
*पेटू लागली आहे.*
*इथे आम्ही दुःख पेलुनि*
*सूर्य आणला दारी*
*काळयुमाची रात्र आता*
*भंगू लागली आहे.*
*आता कशा देणार तुम्ही?*
*रानफुलांच्या आहुती*
*यज्ञामधला अग्नी आता*
*विझू लागला आहे*
*किती काळ जपाल आता !*
*जीर्ण घरांच्या वस्त्या*
*नव्या युगाचे वादळ आता*
*गर्जू लागले आहे.*

**— बळवंत मडावी**

## *आपण वनवासी*

*आपण जंगलात राहणारे ।*
*निसर्गाशी नाते सांगणारे ।*
*आपण वनवासी ॥*
*जीवन आपले झाडा झुडपात ।*
*अन्न आपले कंदमुळात ।*
*परंतु झाला आपला घात ॥*
*जंगलातून फिरवला जंगल तोडीचा निखारा।*
*हिरावून घेतला आपला निवारा ।*
*जीव झाला घाबरा ॥*
*नष्ट झाले जंगल नष्ट होते आपली संस्कृती ।*
*आता हा अन्याय सहन करणार किती ।*
*काढून टाका मनातली भीती ॥*
*सीमा होऊन गेली सहनशीलतेची ।*
*वेळ येऊन गेली प्रतिकाराची ।*
*आपले सामर्थ्य दाखविण्याची ॥*
*करू तीक्ष्ण लेखणीची धार ।*
*तेव्हाच होईल बेडापार ।*
*हाच आपल्या जीवनाचा आधार ॥*

**— सुभाष पी. जाधव**

# अकोले तालुक्यातील आदिवासींची प्रगती व सुधारणा : एक अवलोकन

लेखक : **श्री. बी. एम. पवार**

अकोले तालुका हा अहमदनगर जिल्ह्यातील एक महत्त्वाचा आदिवासी तालुका आहे. ह्या तालुक्यात एकंदर २०० गावे असून एकूण लोकसंख्या २५ हजार इतकी आहे. ह्या तालुक्याच्या एकंदरीत स्थितीची पाहणी किंवा अवलोकन केल्यानंतर मला असे आढळून आले की, ह्या तालुक्यात सर्वत्र समाधानाचे वातावरण दिसले. विविध कलाकुसरीची कामे करणारी विविध जाती, धर्म, पंथांची मंडळी आनंदाने राहातात. तसेच ह्या तालुक्याचे नंदनवन करणारे व ह्या तालुक्याचे वैशिष्ट्य म्हणून प्रसिद्ध असलेले असे भंडारदरा हे धरण फारच महत्त्वाचे आहे. हे धरण तालुक्यातील सर्वच शेतकरी बांधवांना वरदान ठरले आहे. ह्या धरणामुळेच आमच्या हजारो आदिवासी व इतर बांधवांचा प्रगतीचा दरा भरला आहे. 'मुळा' आणि 'प्रवरा' ह्या उभय नद्यांनी ह्या तालुक्याला नेहमीच चांगली अंघोळ घातली आहे. प्रवरा नदीच्या काठावर वसलेले प्रगतीचा धबधबा नेहमीच जोराने पुढे नेणारे, सौंदर्याने फुललेले असे हे अकोले तालुक्याचे गाव एक छोटेसे शहर वाटते. ह्या तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय, शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्याचा प्रयत्न मी केला आहे.

**सामाजिक :** सामाजिक स्थितीचा विचार करता अकोले हा जरी आदिवासी तालुका असला तरी इतर लोक देखील येथे गुण्यागोविंदाने राहातात. येथील समाज हा एकसंध, प्रामाणिक, विश्वासू, एकनिष्ठ असा आहे. विविध व्यवसायात रममाण असणारी ही आदिवासी मंडळी फार समंजसपणे राहातात. निसर्गावर पूर्णपणे विश्वास ठेवून त्यालाच सर्वस्व देव समजून त्याच्यावरच ते जगतात. 'निसर्गात भरुनी राहे अनादि अनंत' असे त्याचे वर्णन करता येईल असे म्हणतात. किंवा संत तुकाराम महाराजांच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे सज्जन' असे ते निसर्गाशी अतूट असे नाते जोडतात. निसर्गावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. समाज दृढ निसर्ग नियमांचे पालन करतो व ते पालन न केल्यास निसर्ग कोपतो मग दुष्काळ, भूकंप, अनावृष्टी आणि अतिवृष्टी सारखी महाभयंकर संकटे येतात असे त्यांचे मत आहे. परंतु आम्ही सारे एक आहोत ही भावना त्यांची फार जुनी आहे. त्यांची एकीची जाणीव फारच चांगली आहे. आणि म्हणूनच त्यांची संस्कृतीही आदर्शप्रद ठरली आहे.

**आर्थिक :** आर्थिक जीवनाचा विचार करता 'अर्थ' हा जीवनाचा स्थायीभाव आहे. आर्थिक परिस्थितीला जीवनात खूपच महत्त्व आहे. 'अर्थःमूलस्य जीवनम्' असे म्हटले ते उगीच नाही. त्यांना आता चित्त, वित्त आणि पित्त ह्या तीन 'त' चा अर्थ चांगला समजला आहे. ह्याचा अर्थ असा की, परमार्थात चित्त हवे, शरीरात पित्त हवे तर संसारात वित्त हवे. आणि म्हणून शासकीय बहुविध योजनांच्या माध्यमातून ते अर्थार्जन करत आहेत. त्यात रोजगार हमी, वृक्षलागवड, डिंक गोळा करणे, विविध कलाकुसरीची कामे ती मंडळी करतात आणि आपला जीवनाचा व्यापार कसातरी चालवितात. ह्या तालुक्यात मोलमजुरी हा देखील एक जीवन जगण्याचा मार्ग आहे. मात्र अशी एक रोजंदारीची

पद्धत आढळते की, दिवसभर काम करताना साधारण १० वाजता सकाळी कामावर जातात. तत्पूर्वी ह्या मालकाकडूनच जेवण करून जायचे व नंतर दुपारीही जेवण तिथेच करायचे, आणि नंतर ५-६ रुपये रोज घ्यायचे अशीही पद्धत येथे आढळते. मात्र एक गोष्ट इथे प्रामाणिकपणे नमूद करावीशी वाटते की, आजदेखील आपला आदिवासी बांधव हा माझ्या आदिवासी भगिनींच्या जोरावर मजा मारताना दिसतो. हे बांधव आजही २४ तास दारू पितात, रात्री उशीरा येतात. मात्र भगिनी ह्या दिवसभर शेतात मरमर मरतात आणि रात्री मुलांबाळांच्या व शेवटी पतिराजाच्या विचारात झोपी जातात. उत्पन्नाची बाब अशी दुसरी काहीही नाही तरी थोड्याफार प्रमाणात असणारी भातशेती आधार देते. पावसाचे प्रमाण कमीच असते त्यामुळे त्याची पोत (प्रत) सुधारलेली नसते. परिणामी त्याला चांगला भाव मिळत नाही व त्यामुळे ४ पैसे हातात मिळत नाहीत. आणि म्हणून मग अशी कष्ट करण्याची वेळ येते. माझ्या आदिवासी भगिनी आणि बांधव हे कष्टाला त्याच्या जीवनाचा मूलगाभा समजतात. त्यांच्या कर्ज, स्त्री, दारू, कष्ट ह्या चार महत्त्वाच्या बाबीत ते कष्टास खूप महत्व देतात. त्यांना फारच लवकर कष्टाचे महत्त्व समजलेले आहे. 'असाध्य ते साध्य करिता सायास' असे श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज सांगतात की, ह्या जीवनात सर्व काही साध्य करता येईल मात्र कष्टाची तयारी त्यासाठी हवी, म्हणून आमचा आदिवासी बांधव सतत कष्ट करतो.

**राजकीय :** राजकीय स्थितीचा विचार केल्यास ह्या तालुक्याची एकंदरीत स्थिती अशी आढळते की राजकारणाबाबत हा तालुका पूर्णपणे जागृत आहे. मतदार शिक्षणाच्या प्रभावामुळे पूर्णपणे सज्ञान झालेला आहे. आदिवासी बांधवांसाठी असलेल्या सर्व योजनांचा ते लाभ पूर्णपणे उठवत आहेत. नवीन १८ वर्षे वरील मुलामुलींना मिळालेला मतदानाचा आधिकार ही एक आनंदाची बाब ठरली असे ते म्हणतात. कोणत्या पक्षाला मतदान करावे, कोणता पक्ष आपणास जीवनाचे कोडे उलगडण्यास मदत करील हे ते आता स्वत: ठरवू लागले आहेत. सभा, संमेलनाला हजर राहू लागले आहेत. हजारो वर्षांपासून ते जे जे अन्याय सहन करत आले आहेत ते सर्व त्याचा आता ते प्रतिकार करीत आहेत.

**आरोग्यविषयक :** आरोग्याच्या बाबत असा विचार करता येईल की प्रत्येक ४/५ गावात एक 'प्राथमिक आरोग्य केंद्र' सेंटर दिलेले असून त्यातून ही मंडळी आपल्या आरोग्याच्या संवर्धनासाठी प्रयत्न करतात. विविध प्रकारच्या गोळ्या, औषधोपचारासाठी ही मंडळी आता दवाखान्यात जातात. कोणत्याही प्रकारच्या अंध-श्रद्धावर विश्वास न ठेवता ते सतत दवाखान्यात जावून आरोग्याच्या समस्या सोडवितात.

**शैक्षणिक :** ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा आहे असे जे समजतात त्यापेक्षा ज्ञान हा माणसाचा खरा मित्र आहे. कारण ज्ञानामुळे सर्व काही साध्य होते. ज्ञान हा एक सद्गुण आहे. अज्ञानासारखा मोठा शत्रू नाही आणि म्हणून जे म्हटले आहे की (हाफ नॉलेज इज अलवेज डेंजरस्) ते नेहमी धोक्याचे असते. ज्ञान हा प्रकाश तर अज्ञान हा अंधकार असे म्हणावे लागेल. म्हणून ज्ञानाचा प्रकाश खेड्यावर, तालुक्यात पोहचविण्याचे कार्य व केंद्रबिंदू म्हणून आश्रमशाळा ठरविता येतील. आश्रम शाळामधून ही मुले आता शिकू लागली आहेत. इतकेच नव्हे तर चांगल्या प्रकारे गुण मिळवून चमकू लागले आहेत.

ही ज्ञानाची गंगोत्री आपल्या इतर बांधवा पर्यंत पोहचविण्यासाठी तो म्हणतो—

*"आदिवासी बाळा आता पुढे पुढे पाय हो*
*पाटीदप्तर घेवूनशान आश्रमशाळमधी जाय हो*

*पहाटेची बेल वाजे घना घना, वाजे धन घना*
*आवरून ठेव आता तुझा तो बिछाना*
*दंत मंजन घेवून तू नदीवरी जाय हो*
*आदिवासी बाळा आता पुढे पुढे पाय हो*
*पाटीदप्तर घेवूनशान आश्रमशाळमंधी जाय हो॥१॥*
*भात भाजी दाळ रोटी*
*ताजी ताजी खाय हो*
*बालक आदिवासी आम्ही झालो गोळा*
*ज्ञानमंदीर ही आमुची आश्रमशाळा हो*
*आदिवासी बाळा आता पुढे पुढे पाय हो*
*पाटी दप्तर घेवूनशान आश्रमशाळांमधी जाय हो॥२॥*

आता ह्या आश्रमशाळांमधून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातात. त्यांना विविध प्रकारच्या परीक्षांना बसविण्यात येते. उदा.- स्कॉलरशिप टि.म.प. (मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, चित्रकला) ह्याप्रकारे त्यांचा विकास साधला जातो. राष्ट्रीय एकात्मकता टिकविण्यासाठी ही मुले दररोज प्रार्थना म्हणतात.
*"खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे*
*कुणा ना व्यर्थ शिणवावे, कुणा ना कधी हिणवावे*
*समस्ता बंधु मानावे जगाला प्रेम अर्पावे" ॥१॥*

अशा ह्या प्रार्थनेतून मुलांची मने सुसंस्कारीत होतात. ह्या तालुक्यास ऐतिहासिक अशी पार्श्वभूमी आहे. अगस्ती महाराजासारखे ऋषी तर कळसूबाई सारखे शिखरही मिळाले आहे. त्याचप्रमाणे ह्या शाळांमधून विविध उपक्रम अवंलबिले जातात. ज्यात जनजागरण, वृक्षदिंडी, वृक्षमित्रांचा सत्कार, ग्रामविकास, श्रमदान, सभा, स्नेहसंमेलने इ. आणि हे सर्व ज्या तालुक्यात आहे तो तालुका कसा आहे हे पुढील पोवाड्यातून ऐका-

*नगर जिल्ह्यातील अकोला तालुका ख्यातीचा*
*लक्ष देवूनी ऐका जनहो इतिहास सांगतो मातेचा*
*इतिहास सांगतो मातेचा ॥१॥*
*सह्याद्रीवर पोथीपुराणी वाघ सिंह हे बडेबडे*
*नव्हता मानव नव्हता दानव दंड अरण्य चोहीकडे॥२॥*
*सह्याद्रीला ओलांडूनी आदिमानव हा आला*
*नाव तयाचे हो अगस्ती, प्रथम आले दक्षिणेला॥३॥*
*सह्याद्रीवर दृष्टी फेकता कळसूबाईचे शिखर दिसे*
*आकाशाला घाली गवसणी, तालुक्याचे भूषण हे असे॥४॥*
*भंडारदरा धरण बांधिले, अमृत वाहीले प्रवरेला --*
*धब धब, धबधब आवाज कशाचा*
*तो तर रंधा फॉल असे, उंचावरुनी पाणी पडे.*
*शोभा तयाची न्यारी दिसे ॥५॥*

अशा प्रकारे एकंदरीत अकोले तालुक्यातील आदिवासींची विविध अंगांनी प्रगती झालेली आढळते. अगस्तीऋषी ते कळसूबाईच्या अतिभव्य शिखराची आठवण ह्या पोवाड्यातून होते. अशाप्रकारे अकोले ह्या आदिवासी तालुक्याची एकंदरीत सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक दृष्ट्या पाहणी करून वरील गोष्टी आढळल्या आहेत.

# अंबेगाव तालुक्यातील पश्चिम घाटावरील आदिवासींचे जीवन

लेखक : **एम. जी. असवले**

आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम घाटावरील परिसर हा डोंगरी असून जंगल दऱ्यांनी वेढलेला आहे. ह्या परिसरात वसलेली जमात ही हिन्दू महादेव कोळी (आदिवासी) या नावाने ओळखली जाते. ह्या परिसरात दळणवळणाची साधने, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, दवाखाने, विद्यामंदीरे, रस्ते, वीज या सारखी सुख-सोयींची साधने अतिदुर्लभ असल्यामुळे तर काही ठिकाणी अजिबातही नसल्यामुळे हा समाज अतिशय मागासलेला आहे. येथे राहाणारा आदिवासी हा शिक्षणाच्या सोयी नसल्यामुळे अशिक्षित, आडाणी, रानटी राहिलेला आहे. सरकारने खेडोपाड्यात किमान ४थी पर्यंत शाळा काढलेल्या आहेत शाळांवर पगार देऊन शिक्षक नेमले आहेत. काही शिक्षक या परिसरातीलच आहेत. परंतु जूनला शाळा सुरू झाल्यापासून १५ ऑगष्टपर्यंत काही शाळा बंदच असतात. काही शिक्षक दारू पिऊन शाळेत झोपतात तर काही जानेवारी ते एप्रिल मधील काही दिवस हजेरी लावून लग्न लावणे, यात्रा पाहाणे ह्या कार्यक्रमांना जातात. विस्तार अधिकारी शाळा तपासणीला आला की त्याला दारू, कोंबडी देऊन चांगला शेरा घेतात. त्याला दारूची नशा जास्त चढली की, शिक्षक धरून दुसऱ्या गावाला घेऊन जातात. ह्यामुळे खेडोपाडी शाळा असूनही तेथील मुलांवर शिक्षणाचा परिणाम होत नाही व शहराच्या ठिकाणी मुलांना शाळा शिकवणे हे या लोकांना परवडणारे नाही. त्यामुळे तेथील अशिक्षित तरुण मुले आपल्या वडिलोपार्जीत पिढीजात व्यवसायावरच आपला उदरनिर्वाह करत असतात.

ह्या परिसरात उन्हाळ्यामध्ये म्हणजे (डिसेंबरअखेर पासून) विहिरी असूनही पुरेसे पाणी मिळत नाही. विहिरीत पावसाचे पाणीच साठवलेले असते व पावसाळा संपल्यावर दोन ते तीन महिन्यात ते आटते. त्यामुळे ह्या लोकांची इतकी बिकट अवस्था होत असते की, पाणी आणण्यासाठी डोक्यावर हंडा घेऊन एक ते दीड तास चालत जावे लागते. आणि जनावरांना पाणी पाजण्यासाठी एका माणसाचा एक दिवस पूर्ण जातो. अशा परिस्थितीत तहसीलदारांना विनंती करूनही ४ ते ८ दिवसांतून एकदा टँकर पाठविला जातो. वळवाच्या पावसाचे ढग आकाशात आले की टँकर बंद! अशा अवस्थेत पाण्याच्या जास्तीत जास्त अडचणींमुळे लोकांना शेतीतील कामे करण्यासाठी खूपच अपुरा वेळ मिळतो. काही ठिकाणी रस्ते नाहीत तेथे टँकरही जात नाही. ते बिचारे दिवसभर पाण्याच्या शोधात फिरतात.

ह्या भागातील लोकांची उपजिविका ही जंगलावरच अवलंबून असते. जंगलामधून मध, डिंक गोळा केला जातो व विकून पैसे कमवले जातात. तसेच उन्हाळ्यात करवंद, आवळे, तोरणे यासारखी फळे गोळा केली जातात. ही फळे विकण्यासाठी ८ ते १० मैल डोक्यावर पाटी घेऊन चालत जावे लागते व बाजाराच्या ठिकाणी नेऊन विकावे लागतात. ५ ते १० रुपये येतील त्याची आठवड्याची मीठ-मिरची आणली जाते. बाजारात पालेभाज्या असतात, त्यांची नावे सुद्धा त्याना माहीत नसतात. ह्या भागात रोजगार हमीची कामे सरकार कधी तरी काढत असते. (वर्षातून एक महिना - दोन महिने) व लोकांना ४ ते ५ रुपये रोज दिला जातो. ह्या परिस्थितीत

आदिवासी लोक आपला उदरनिर्वाह कसा करतील? उन्हाळ्यात पैसे मिळवण्यासाठी हिरडा गोळा केला जातो व त्याची चांगल्या प्रकारे वाळवण करून बाजारात नेतात. व्यापारी मागेल त्या भावाने विकावे लागतात. कारण त्यावेळेस आदिवासी सोसायट्या बंद असतात. उघड्या असतात परंतु ज्या वेळेस व्यापाऱ्याकडे माल असतो त्या वेळेस. तशात सोसायटीमध्ये एकही कामगार आदिवासी नसतात. हमाल फक्त आदिवासी. 'जेथे पिकते तेथे विकत नाही' ह्या म्हणीप्रमाणे हिरडा असूनही तेथे हिरडा फॅक्टरी किंवा हिरड्याचा काय उपयोग होतो हेच माहीत नसल्यामुळे हिरडा पैशाचे साधन असूनही तोटाच पदरात घ्यावा लागतो. विकून येणाऱ्या पैशांमधून (पावसाळा म्हणजे चार महिन्यांची रात्र, कारण नद्यांवर पूल नाहीत. पाऊस जास्त पडत असतो. बाजारात जाता येत नाही.) म्हणून मीठ-मिरची आधीच आणली जाते व पावसात काम करण्यासाठी घोंगड्या आणल्या जातात. अशा प्रकारे पावसाळा संपेपर्यंत काटकसरीचे जीवन जगत असतात. एखादा माणूस ह्या दिवसात जास्त आजारी असला तरी दवाखान्यात नेण्यास इलाज नसतो. शेवटी आजार जास्त वाढून मृत्यू पावतो. अनेक हानिकारक गोष्टी त्यांना सोसाव्या लागतात.

या भागातील शेती ही फक्त पावसाच्या पाण्यावरच अवलंबून असल्यामुळे शेतीत भात, नाचणी, वरई, सावा हे मुख्य धान्य पिकवतात. पाऊस पडला नाही तर वर्षभर कष्ट केल्याचा काहीही उपयोग होत नाही. त्यातून थोडेफार पिक आले की, रानडुकरे, भेकरे, वानरे, सायाळ, ससे या रानच्या वन्य पशूंचा तसेच पक्षांचा त्रास, नासधूस होऊन शेतकऱ्याला शेतीतील उत्पन्नाचा चौथा हिस्सा सुद्धा मिळत नाही. जमीन एक-एका शेतकऱ्याला ५०-६० एकर पण त्यापैकी ४० एकरात गवत सुद्धा उगवत नाही तर शेती कशी येणार? मग तो काय त्या डोंगरावरची माती की दगड खाईल? अशी परिस्थिती आली. अधिकाऱ्यांना वाटते ५० एकर जमीन असून अजून काय पाहिजे? हे सर्व बरोबर. पण १० एकरात पीक घेतले जाते ह्याच्यात अनेक भाऊ-हिस्से. सतत वादावाद, भांडणे. ह्यामुळे पीक येणाऱ्या जमिनीत बांधच जास्त. मग हे लोक कशी शेती करणार, आणि जीवन कसे जगणार?

आदिवासी समाज हा शहरी भागाच्या बाहेर लांब वसलेला असल्यामुळे तसेच त्यांना शिक्षण न मिळाल्यामुळे हे लोक भित्रे बनले. त्यांच्याजवळ सरकारकडून सुखसोई भांडून घेण्याचे धाडस नाही व सुख सोयी सरकारने कोणकोणत्या अंमलात आणल्या आहेत, हेही माहीत नाही. सरकारनेही त्यांच्यापर्यंत पोहचविल्या नाही, हा काय सरकारचा दोष नाही. कारण ह्या योजना राबविण्यासाठी अधिकारी वर्ग नेमला आहे. परंतु, हा वर्ग त्यांच्यापर्यंत जावून पोचला नाही. कसा जाणार हा वर्ग? त्या भागात रस्ते नाहीत, अगर त्यांना राहाण्याच्या सोयी नाहीत, तर त्यांच्या गाड्या कशा जाणार? ८-१० गावं मिळून ग्राम-पंचायती आहेत परंतु त्या पंचायतीतील काही सरपंच आडाणी. त्यांना स्वतःची शिफारससुद्धा लिहिता येत नाही, तर दाखले सोडाच! थोड्याफार योजनांची माहिती मिळाली तर अगोदर त्यांच्या सुखसोईसाठी प्रयत्न मग गावातील लोकांना. ग्रामसेवक सरकारने नेमलेला, तो त्या परिसरातील नसतोच. दाखला देण्यासाठी ५ रुपये घेतात तर योजना राबवण्यासाठी काय करत असतील? अशा प्रकारे ह्या भागात योजना राबवल्या जातात.

ह्या परिसरातील काही तरुण वर्ग नोकरीसाठी शहराच्या सान्निध्यात येऊन सुशिक्षित झाला आहे. शिपायांपासून साहेबांपर्यंत जावून पोहचले आहेत. पण तेही अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेत. कारण आपल्या समाजासाठी काम करणे म्हणजे पोझीशन डावून करून घेणे असे त्यांना वाटते. आपल्याला नोकरी आहे मग समाज गेला खड्ड्यात. त्यांना असे वाटत नाही की, आपल्या

आदिवासी बांधवांना अत्याचार, अन्याय पिळवणुकीला का बळी पडू द्यावयाचे? आणि ह्या भागातले कार्यकर्तेही असेच. पुढारीपणा करावयाचा, आपण सुधारावयाचे व जो आपल्याला चांगले म्हणेल त्याच्यासाठी थोडेफार प्रयत्न करावयाचे म्हणजे जिकडे लाह्या तिकडे उदो-उदो करावयाचा, भ्रष्टाचाराला बळी पडावयाचे असे हे कार्यकर्ते. मग मला वाटते ती कुसुमताई बरी. ती तर ना आदिवासी जातीची परंतु खेड्यापाड्यात, वाड्यावस्तीत जावून तेथील लोकांच्या अडीअडचणी सोडवण्याचा प्रयत्न करते व लोकांना रोजगार मिळवून देते.

आदिवासींचा जंगलाशी निकटचा संबंध येत असतो. कारण खाण्यासाठी काही वस्तू जंगलातून आणल्या जातात. तसेच गुरे चारणे, सरपण आणणे, अशात फॉरेस्ट खात्याचा त्रास. शेतीची नासधूस डुकरे करतात. जनावरांना वाघ खातात. डुकरांना मारले तर दंड, वाघास मारले तर अटक. नुकसान-भरपाई तर नाहीच नाही. खरे पाहाता जंगलाचा सांभाळ येथील लोकांनी केलेला आहे. ह्या लोकांना जीवनावश्यक वस्तू मिळतात म्हणून उन्हाळ्यात जंगलाला आगी लागू नयेत म्हणून हे लोक रिसी घेतात, झाडे जगवतात. झाडे तोडणारे - फॉरेस्ट खात्याच्या पासावर आलेले-- ठेकेदारांचा लाकडे तोडणे हा मोठा किफायतशीर धंदा आहे. परंतु ह्या भागातील आदिवासी श्रीमंत झालेला नाही. जंगलावर पोटच्या मुलाप्रमाणे प्रेम करणारे आदिवासी, तोडणारे ठेकेदार व अधिकार गाजवणारे फॉरेस्ट खाते, ह्यामुळे वनाचा विकास होण्याऐवजी वन कर्मचाऱ्यांचाच विकास होतो. आदिवासींचा विकास होण्याऐवजी योजना राबविणाऱ्यांचाच विकास होतो. अशा परिस्थितीत आदिवासी जीवनात दिवस असूनही काळोख पसरलेला आहे व ह्या अंधारात हा समाज खितपत पडलेला आहे.

## कशी ही जात आपली?

*दुःशासनाने डाव साधुनि*
*स्वप्ने फितवून नेली*
*घरट्यांना आग ... तरीही*
*अजाण कशी ही जात आपली?*
*बहुरुप्यांनी मुखवट्यांचे*
*दुकान मांडले दारी*
*अब्रुचा लिलाव ... तरीही*
*निवांत कशी ही जात आपली?*
*व्यसन, आळस देही आले*
*संसारी अवदशा*
*मरणाला रात... तरीही*
*बेधुंद कशी ही जात आपली?*
*वाघ-सिंहाची छाती असुनि*
*कावळे वाकुल्या दावी*
*स्वातंत्र्याचा काळ ... तरीही*
*गुलाम कशी ही जात आपली ?*

**— बळवंत मडावी**

## घर

*डोंगरा आडचा सूर्य,*
*दिसेनासा झाल्यावर*
*गुराखी गुरे घरी आणतात.*
*पक्षी घरट्यात परततात*
*'काही माणसे' मात्र*
*घर शोधत फिरतात?*
*कुठेतरी चुली पेटलेल्या असतात.*
*इथे मात्र चुलीच नसतात*
*इतलं जगणं भयाण असतं*
*जणू काय दुसरे स्मशानच असतं.*
*वाटतं काळोख कधीच येऊ नये*
*आल्यावर कधीच उजडू नये.*

**--सोपान सुरकुले**

# देवकी पोटवडली

लेखक : **मारुती कुळमेथे**

**ज्या** कोणाले ढोरं राखायचे असेल त्यांनी उद्या सकाळी आखरावर काठी घेऊन हजर रहावेऽऽऽ जीऽऽऽ येवतीच्या कोतवालानं जेवनरात्री दवंडी दिली. मिरगाच्या पावसानं कुणब्या धातब्यांनी वावरं ढारवडणं सुरू केलं होतं तर कोणी शेवाणं फोडून कडबा घरात भरून ठेवत तर कोणी सफा झालेलं वावर तुडवू नये म्हणून कुपकाटी करायला लागले होते. वावर उलंगल्यापासून गेल्या दोन महिन्यापासून मोकाट चरणाऱ्या जनावरांना राखण्यासाठी कोतवालानं दवंडी दिली होती. हुसन्या ताटीच्या बन्नाटीले वाकानं काचवा घेऊन बुरानं घर शिवत होता. दवंडी झाल्याबरोबर हुसन्याले मोठा हुरुप आला. या वर्षी त्याच्या बरोबर आणखी एक गणपत्या नावाचा गायकी काठी घेऊन आखरावर उभा झाला होता.

दुसऱ्या दिवशी उजाडायच्या आतच झुलपटं झुलपटं सिली बांधलेली पाच खड्याची काडी, पायात रबरी वहाणा व डोक्याला उपरणं आन् पोत्याची घोंगुस करून हुसेन आखरावर उभा राहिला. थोड्या वेळानं गणपतही काठी घेऊन हजर झाला. नाही म्हटलं तरी हुसन्याच्या काडीचा हातगुण चांगला असल्यामुळे ढोरं सवारतात असा गावातल्या लोकांचा समज म्हणून सालाबादाप्रमाणे याही वर्षी हुसन्याकडे दोन खंडी धन गोळा झालं. वावर उलंगल्यानंतर मोकाट चरण्याचा माहूरा झालेल्या दोन खंडी जित्रूबांना आगूटणं तसं हे फार गहण काम पण पहिल्याच दिवशी हुसन्यानं दोन खांडी ढोरं आगुटले. पहिला दिवस असल्यामुळे जनावरं धुंधाडीसारखे पळत सुटायचे त्यांना राखता राखता हुसन्या हाडाची काडं आणि रक्ताचं पाणी करायचा. हा दिवस त्यानं कसे तरी लवटारून काढला. दुसऱ्या दिवशी हुसन्या उठला आणि काठी घेऊन आखरावर जाण्यापूर्वी गजूबाईले सांगून गेला. तिरिप निघाच्या आंदी जगन ले आखरावर धाडन देजो. ढोरं नरकुडाकराले धावते एकट्याचा जीव घाईस येतो. म्हणून एका मेरनं तो राहील. बोबड्याच्या झापानं कुपकाटी हायेस इकडं पांदीन मी राहीनं तेवढास हातगोटा. नवसिके जित्रुब बारबंड पळतात. दोन दिवसात हुसन्याले ढोराचा अंदाज आला. मारकुंडे आणि, चोरट्या ढोरांना लोडणं घालण्यासाठी मालकाला सांगाले, हुसन्या विसरला नाही.

मिरगाच्या एक दोन पावसानं चिवट फुटलं होतं. त्यामुळे ढोरं चाऱ्याला लागले होते. सकाळी आखरावर ढोरं जमा करून हुसन्या बंदरात न्याचा आणि जगन तिरिप निघाल्यावर कोर कुटका खाऊन गोहण होकरायचा.

त्या सकाळच्या वेळात हुसन्या गावात राखण मागून आणायचा मग तो मागून आणलेली जवारी गजी जात्यावर भरडायची आणि कन्या भाकरी करून खायचे असा नित्याचा क्रम सुरू झाला.

ज्या बंदरात ढोरं होकरायचे तिथं गोदरी असल्यामळे गाई नरकुडा करायला बायांकडे धावत सुटायच्या, त्यांना कलवण्यासाठी जगनही त्यांच्या मागे धावायचा. ह्यामुळे बाया जगनला खूप शिव्या द्यायच्या कारण जगनमुळे बायांना उठ बस करावी लागत असे. जगनलाही हे आवडत नव्हतं. पण पोटापुढे आवडी-निवडीचा विचार न करता अक्षरश: तो नरक तुडवत होता. तेव्हा त्या बायांचा राग जगन, ढोरांना शिव्या हासडून काढायचा. संपूर्ण बंदरात फिरतांना एक किडा विष्ठेचा गोळा करून तोंड जमिनीवर व मागच्या पायानी ढकलत नेतांना जगनला दिसला. थोडा थबकून तो म्हणायला लागला-

येड्या गवारा जाशी शिवारा!

बिन बंधानं आणशील भारा॥

आरवाडी जवळ येऊ लागली. एक दोन पाणी भरपूर पडल्यामुळे वारा मोठा झाला होता. त्यामुळे गाई गोहणात रमायच्या तर काही जनावरं रोयका करत बसायची. पण जगनचं मन मात्र उदास व्हायचं. अर्थात त्याला तसं कारणही होतं. त्याच्या वयाची पोरं सकाळी उठून भरपूर खेळायची, बागडायची आणि नंतर आंघोळ करून चांगले कपडे घालून घंटी वाजली की शाळेत पळत सुटायची. हे सर्व तो बंदरातून पहायचा, त्यामुळे त्याला त्या शाळेत जाणाऱ्या मुलांसारखं राहायला मिळत नाही. ढोरांच्या मागं काठी घेऊन नरक तुडवत चिलाटी, बोराटीच्या बनात फिरणं. एवढंच त्याच्या वाट्याला होतं आणि यांचंच त्याला दु:ख होतं. लेखणी पाटीच्या ऐवजी नियतीनं त्याच्या हातात पाच खड्याची काडी दिली होती.

आखाडी एक दिवसावर आली होती. दोन खंडी धनातल्या काही गाई माडात जाणार होत्या. त्यामुळे दोन खंडीतून दिडच खंडी जित्रुबं फक्त गोहणात होते.

झित्रु भोयाची कालवड उन्हाळ्यात माजावर आली होती आन् आखाडात धना गेली होती. आता ती गाभण होती, म्हणून झित्रू भोई दररोज आखरावर त्या कालवडीले गोहणात घालतांना हुसन्याले सांगायचा हुसन्या कालवड गाभण हाये जरा ढोरं हुदाडे मारतात थोडं लक्ष ठेवजो.

मोहाच्या सरानं गोहण न्यायच असं बापलेकांन सकाळीच ठरवलं होतं. ठरल्याप्रमाणे दुपारी आखरावरून गोहण उठवलं आणि मोहाच्या सरानं निघालं. पांदीनं जाता जाता बोरकुट्याच्या जवारीतून देवगाईचा सांड्या गोहणात घुसला आणि एका बैला बरोबर त्याची टक्कर सुरू झाली. ह्या टक्करीत शित्रू भोयाची कालवड खडकावर आपटली. बराच वेळ ती उठलीच नाही. गोहण चरतचरत दूर गेलं तरी ती तिथंच बसलेली होती. म्हणून हुसन्या तिला उठवाला गेला. थोड्या वेळानं ती उठली व कोकडी कोकडी चालू लागली. दिवस कलला, लोक घराकडे जाऊ लागले, गोहणही गावाकडे निघालं. हुसन्या व जगन घरी पोहोचले. जेवनरात्री झित्रूची कालवड उठबस करू लागली. झित्रू भोई सनकाडी पेटवून त्या कालवडीले पहायला गेला तेव्हा तिच्या निरणातून रक्तामासाचा गोळा पडतांना दिसला आणि तो घाबरला, त्यानी आजूबाजूला गलबला करून चारचौघं गोळा केलीत. जिभेला हाड नसल्यासारखं अनेकांचे अनेक मतं - शेवटी सर्वानुमते झित्रूच्या कालवडीला करतुकी केली या मतावर सहमती झाली. मग ही करतुकी करणारा कोण? असा प्रश्न सर्वांपुढे निर्माण झाला. त्याला शोधण्यासाठी गावातल्या भूमकाकडे गेले. त्यांनी भूमकाला सर्व हकिकत सांगितली. भूमकानी देव अंगात आणून देवकीचं हे काम आहे असं सांगताच सर्वांनी हुसन्याच्या घराकडे मोर्चा वळवला.

देवकी बाळंतपणासाठी आखाडीपासून भावाच्या हुसन्याच्या घरीच होती. पहिलच बाळंतपण त्रास होते. बाळंतपण सुखरूप व्हावं म्हणून देवकीला माहेरी आणलं होतं. परंतु पुढे काय वाढलेलं आहे याची तिला काय कल्पना. देवकीला बाळाची चाहूल लागली होती. त्याने ती सुखावली होती. इतक्यात दहा बारा लोकांचा गलका हुसन्याच्या घराच्या दिशेनी निघाला. हुसन्या बाहेर निघ, देवकीलाही बाहेर काड, जादू करणी करणारी चेटकीण झित्रूच्या कालवडीवर करणी केली असं म्हणून काहींनी हुसन्याला बदडायला सुरुवात केली तर दोघे घरात घुसून देवकीला झोपेतूनच फरफटत अंगणात आणून लाथाबुक्यांनी मारायला सुरुवात केली. इतकं मारलं, की शेवटी त्या कालवडीबरोबरच देवकीच्या निरणातून रक्ताहाडा मासाचा गोळा बाहेर पडून देवकीही पोटवडली.

# सवारी

लेखक : **भुजंग मेश्राम**

(पडदा उघडतो तेव्हा दुरून मोहरमच्या डफड्यांचे आवाज येतात. आंध्रप्रदेश - महाराष्ट्र सीमेवरील हातनूर या गावच्या ग्रामपंचायतीचा गुरांच्या कोंडवाड्याचे दृश्य. हा कोंडवाडा स्टेजच्या एका बाजूस असून, कोंडवाड्यांतून चाबकाच्या फटक्यांचा व घोड्यांच्या भयाण खिंकाळण्याचा आवाज येतो. मधूनच मोहरमच्या डफाच्या आवाजासोबत नुसते 'दुल्ला दुल्ला'-- 'हासेन हुसेन दुल्ला' - असे आवाज. यावरून मोहरमची सवारी कोंडवाड्याच्या रस्त्याने येते हे सूचित व्हावे.

गावचा सरपंच रामा रेड्डी हा हुसन्या परधानाच्या म्हाताऱ्या घोड्याला चाबकाने मारतो आहे. अर्थात घोडा आणि रेड्डी दिसत नाहीत, त्यांचा केवळ आवाज. हुसन्या परधान मात्र कोंडवाड्याबाहेर रेड्डीला विनवतो आहे. इतक्यात सवारी जवळ जवळ येत आहे.)

**रेड्डी** : (घोड्याचे खिंकाळणे) नी लंजा कोडका! कोंचबी वावर चराला तू काय देवाचा सांड्या हो का बे डंगऱ्या? (चाबकाचा फटका : घोड्याचं खिंकाळणं) हा घे फुकटचोद्या -- बोलव बोलव -- निजामाला बोलव आगर हुसन्याला --

**हुसन्या** : (गयावया करत, मोठ्याने) मायावाल्या घोऱ्याले सोरा मालक! थुमच्या पाया परतत - मापी मांगतत - पैल्यांदाच सेतात घुसला जी, नाय त पडीत गावरान चराची आदत त्याची - सोरा जी - घोऱ्याची काई बी भूल नाई - (मोहरमची सवारी आता कोंडवाड्याजवळ आली आहे. लोक नाचतात. सवारीचे झाड आणि वाघाचे सोंग घेतलेला नर्तक नाचतो. लोक 'दुल्ला दुल्ला' म्हणतात. हुसन्याच्या आकांताने लोक गप्प होतात. वाघ व झाड नाचतच राहतात.)

**मालक** : घोडा कुठीबी नाई चरला जी - सोरा ना.

**रेड्डी** : (आतून, फटक्याच्या आवाजासह) सोडून सोडून थकलो बे हुसन्या! पोराबानी या घोड्याले बी मोकाट सोडून टाकला! घरात खावाले दाना नाही, आन् चल्ला मातर घोडा पोसाले! तुला समदा गाव पोसतो, अन् थू घोड्याले - (सर्व हसतात) वारे परधान्या, आयजीच्या जोरावर बायजीचा --

**हुसन्या** : (उसळून. लोक स्तब्ध. वाघ व झाड नाचतच) फाआ जी मालक - मायावाली कोतवाली काहाडचं काम नाई ह्यं! सांगून ठिवतो - मरमर काम करतो तवा मांगतो - रायली घोड्याची बात. निजामाच्या इनामदारानं थो माले इनाम देल्ला - त्याला इकीन नैत ठेवीन - माही मर्जी - पर घोडा थुमच्या वावरात धसल्याचा काही पुरावा हाय का!

**रेड्डी** : (स्टेजच्या कडेला येऊन) आस्सं! घोड्याच्या शेपटीला न पायाला चिखोल लागला थो कुठलं? (घोड्याची शेपटी पकडून दाखवण्याचा अविर्भाव. पुन्हा घोड्याची खिंकाळी. घोडा लाथेने, रेड्डीला कोंडवाड्याबाहेर टापेने फेकून देतो. रेड्डीच्या मांडीला मुका मार लागलेला. लोक 'खिखिखिखि'- असे हसतात, घोड्याचे मोठ्याने खिंकाळणे, दावण तोडून घोडा पळून गेल्याचा आवाज. आता रेड्डी ओरडतो. दोन्ही हातांनी तोंडावर बोंबा) ब्वो-ब्वो-ब्वो-- नी अम्मान देंगूस्ता! (लोक हसतात, तसे त्यांचेकडे उसळून) इच्याभईन हेपत झवेहो - हसाले काय झाले बे लेकांनो? (वाघ व झाड नाचतच)

**हुसन्या** : (रेड्डीला उठवण्यासाठी वाकतो) सांगल नोहतं का मालक कि, मारका घोरा हाय मनून? माझी काय चूक हाय?

**रेड्डी** : (उसळून) आबे हाट परधान्या! हात नोको लावू मला- बाटवतो का? (तसा हुसन्या मागे

होतो. सवारी मधील लोक रेड्डीला उचलतात, आता सवारीचे डफडे जोरात वाजते. लोक 'दुल्ला दुल्ला' करतात.)

आता तुया घोड्याले बगतो आन तुलाबी - दोगालाबी काढतो गावाबाहेर! नाई तुला गिट्टी फोडाला पाठवला, तू माहा बाप दुसरा - (मांडीत असह्य वेदना.)

अम्मा वो अम्मा - (सवारी नाचत वाजत जाते. हुसन्या बाजूला उभा राहतो. सवारीच्या पाया पडतो. हुसन्यावर उजेड, बाकी अंधार)

**हुसन्या** : (स्वगत) वाहा रे महादेवा! इनाम देल्ला कि सजा? नवाबाचा जीव वाचवलो मनून घोरा भेटला इनाम! याच्यानं गाव दुस्मान होत आसलं त काय भारे बांदाचं हाय का? नवाबा - आगा नवाबा - (हुसन्याला नवाबाने इनाम दिलेला प्रसंग आठवतो. स्टेजच्या दुसऱ्या बाजूला हे दृश्य घडते. म्हातारा हुसन्या स्थिर. स्टेजच्या दुसऱ्या बाजूला तरुण हुसन्या. नवाबासमोर जोहार करतो. नवाबासोबत पाठीमागे ५ सैनिक. हुसन्या आदबीने उभा)

**नवाब** : (हुसन्या वाकतो) नाम क्या है तुम्हारा?

**हुसन्या** : (अदबीने) हुसन्या परधान, मालीक. मई हातनूर का कोतवाल हूँ.

**नवाब** : हम तुमपर बहुत खूश है. आज इस घने जंगलमे तुमने हमारी जान बचाई है.

**हुसन्या** : वो तो मेरोवाला फरज था नवाबसाब!

**नवाब** : शबास! लेकीन गलती हमारी है. पायखाने जाते वक्त हथीयार न लिया और सामने शेर-

**हुसन्या** : शेर कू आँक दाकवना बी हथार हैय मालीक! कबी कबी धमकी से काम चलता हैय. शेर के आँक से आँक मिलाके देको तो वो भागता हैय. मयावाल्या आज्यानं गेस्ट सांगली!

**नवाब** : बहोत खुब! मांगो तुम्हे क्या चाहीये?

**हुसन्या** : (अवघडून) मई हाव कोतवाल. समजता नई काय मागूं?

**नवाब** : तुम्हे अच्छी-बुरी खबर लेकर दूर दूर जाना पडता होगा. हम तुम्हे हमारा मशहूर घोडा राणा इनाम देते है! इसे दोस्त जैसा रखना. बेचना मत. काम आयेगा! (हुसन्या कृतज्ञ. हळूहळू अंधार होत जातो. स्टेजच्या दुसऱ्या बाजूला म्हाताऱ्या हुसन्याच्या डोळ्यात पाणी.)

**हुसन्या** : (स्वत:शीच) काय गंमत हाय, फाआ - नवाबानं माले घोरा, एक डोरा देल्ला! या डोऱ्यानं जीनगानीची शान वारली जलूमभर कोतवाली केली. माहा पोर्गा घोऱ्यावर बसू बसू वारा पिवू पिवू मोट्टा जाला. सिकला सवरला. मातर आजून गावातनी त्येचा जीव रमला (आठवून एकडे तिकडे पाहात) कोटी गेला रे जंगा? (मोठ्याने हाका मारतो) जंगा-ऽऽ जंगा-ऽऽ अरे जंग्या ऽऽ कोटे मेलास रे पोट्टया?

(हळूहळू म्हाताऱ्या हुसन्यावर अंधार. स्टेजच्या दुसऱ्या बाजूला हुसन्याचा मुलगा जंगा आणि सरपंच रेड्डीची मुलगी रेनी गायठाणच्या गवतात बसले आहेत. रेनी गवताशी चाळा करते आहे. मधून मधून घोड्याच्या फुरफुरण्याचा आवाज. पाखरांचा चिवचिवाट. मधुनच गुरांच्या हंबरण्याचा आवाज.)

**रेनी** : काय रे जंगा, यवढा सिकून तू घोड्याला चारत बसतो?

**जंगा** : आन् थू पाटलाची पोरगी असून गाई का राखते?

**रेनी** : गाई चारता चारता तुही भेट होवावं म्हणून रे बाबा!

**जंगा** : माहा बी तसचं समज! (घोडा खिंकाळतो) पर तुहा बाप रेड्डी हाय. कदी आपल्याला फायलं तर चिरून टाकील हो.

**रेनी** : (हसून) माझ्या बापाला फक्त शिव्या द्यायला जमते. त्याची पाटीलकी मंजे नुसतं सोंग! मोहरमचा वाघ कधी कुणाला खातो का? समजा

असला बी उलटय्या काळजाचा, त्येचं काय भेव?

**जंगा** : पर तुझ्या बापानं माझ्या घोड्याला भाय झोडपलं. उद्या माझ्या बापाला मारलं थे मी काय करू?

**रेनी** : (लाडात येत) मला पळवून ने जो!

**जंगा** : जग काय म्हणेल रेनी?

**रेनी** : (आणखीच लाडात) रेड्डीच्या पोरीनं परधान्याच्या पोराला पळवलं!

**जंगा** : माही गंमत तू नाही करत ना तू?

**रेनी** : (गळ्याची शपथ घेत) मायच्यानं जंगा. गंमत नाही. तू मला आवडतो. हुंडा देऊन जातीतल्या अंगठा छाप नवरा करण्यापेक्षा तुझ्यासोबत पळून जाणं आवडल. तशी मी तयारी बी केली जंगा- आनकी काय करू?

**जंगा** : आणखी येक तयारी ठेव. तुझ्या बापाचं गर्वहरण पचवण्याची. आन् माझं स्वाभिमान समजून घेण्याची.

बापजाद्यांनी घोडे खाजवले. कोतवाली केली. मात्र इनामाच्या घोड्यानं आम्हाला स्वाभिमान दिला. तो घोडा आन् स्वाभिमान तुहा बाप लुबाडू पायतो-

**रेनी** : तू काय करणार हायेस?

**जंगा** : मी अस्सं होऊन देणार नाई, झालं तू गप्प बसणार नाई!

**रेनी** : वारे माझ्या वाघा! (घोडा जोरजोरात खिंकाळतो. दोघेही दचकून तिकडे पाहतात व स्तंभीत होतात. रानात नाग-नागीणीचा लाग लागलेला आहे. फुस्सऽऽ फुस्सऽऽ असा आवाज येतो आहे. जंगा, रेनी सावध होऊन दूर होतात)

**रेनी** : (घाईत) जंगा चल पळ- नागांचं भांडण जुपलेयं!

**जंगा** : (जोरात हसतो) येडी रे येडी! पिकली पर सिकली नाई तू. नाग असं भांडत नाहीत, पिरेम करतात — झोंगा खेळतात झोंगा!

**रेनी** : (एकाग्र होत) किती सळसळतं प्रेम हे? किती नैसर्गिक ! ये, तू बी नागावानी पिरेम करशील ना माझ्यावर?

**जंगा** : करशील मंजे? केलंच पायजे. मातर त्याआदी आपलं लगीन झालं पायजे ना!

**रेनी** : (ठामपणे) उहूं! पळून गेलं पायजे पळून!!

**जंगा** : मोहरमची सवारी येऊ दे रंगात - (तिचा हात पकडतो, तिच्या हाताची एकेक बोट मोजत आजीने केलेली गंमत करतो म्हणजे बोटं मोजून काखेत गुदगुल्या करतो

- हि मन्ते लगीन करू, थी मन्ते कहान करू

हि मन्ते करज काडू, थी मन्ते कहान फेडू

हि मन्ते परून जाऊ ऽऽऽ - (तशी रेनी हसत सुटते. अन् हसता हसता-)

**रेनी** : पर मला घोड्यावरून पळवून नेलं पायजे बरं! जंगा, मला घोड्यावर बसायला शिकव ना- (तसा घोडा खिंकाळतो, टापा वाजवतो)

**जंगा** : (हसत) बघ बघ, तुज्याआंधीच घोड्याला किती घाई झाली? चल बरं. लगाम धर. संभाळून. घोड्यावर जीन नाई बरं! सालटं निगतील सालटं!

**रेनी** : निगू दे ! चाबकाच्या सालटांपेक्षा हे परवडले — नाही रे घोड्या? (घोडा जोर जोरात खिंकाळतो हळूहळू दोघांवर अंधार. हळूहळू टापांचा कमी होणारा आवाज. स्टेजच्या दुसऱ्या बाजूला सरपंच रेड्डी विव्हळत उपडा झोपला आहे. नोकर त्याच्या हातापायांची मालीश करत आहे. रेड्डीचा दरबार भरला आहे)

**पहिला** : (वाकून) मालक एक इच्यारू?

**रेड्डी** : घाबरला? तुही बैलजोडी सुखरूप हाये!

**पहिला** : तसं नाई मालक -

**रेड्डी** : फार झाकटीत तुझे बैल नेले. मन्लं झोपेत त्रास कशाला?

**पहिला** : मंजे अजून छकड्यानेच गावाला जाता ?

**दुसरा** : घोडा अगर फटफटीची सोय झाली तर ?

**रेड्डी** : इथंच तू मार खाल्लो. आता नावापुरता पाटील रायलो. रेनीला बगायला चार लोक आले- घोडा गाडी नाई पाहून निगून गेले. यक जमाना आसा होता भुमन्ना, कि एक खंडी घोडे होते. एकेक करून सर्व मेले. कोणी मंतत दुस्मान लोकांनी विष देऊन मारले !

**तिसरा** : मालक, थुमची इज्जत ती गावची इज्जत. हे मायम त्या भिकमांग्या हुसन्याला समजत नाही का ?

**चौथा** : माझ्यासारखा कोतवाल असता घोडाच काय आपला जीव भी पाटलाला दिला असता !

**पाचवा** : त्या हुसन्याला मनावं पाटील तरी होऊन दाखव !

**सहावा** : जातच अशी हाय परधान – कि जिथी जाईल तिथी सडगान !

**रेड्डी** : पर माझ्या पोरीच्या लग्नाचं वाटोळं झालं, त्येचं काय ? त्या घोड्यानं बी माजी मांडी फोडली – नाही त्या दोघांयला लगाम घातला त् मी बापाचं नाव बदलीन –

**पहिला** : मंजे हुसन्या घोडा देत नाई मंतो का ?

**दुसरा** : मंग ?

**तिसरा** : तवा त्येची गावकीची रसदच बंद केली पायजे !

**सर्वजण** : (दाद देत) एकदम बेस्ट !

**रेड्डी** : त्याची कोतवाली बी बंद ! एम दी ?

**सर्वजण** : (टाळ्या वाजवत) बेस्टच बेस्ट !

**चौथ्या** : (सर्वांना गप्प करत) श्यूऽऽ ! हुसन्या इकडेच गावकी मागत येतो. त्याला हिस्का दाकवाच मालक !

(नोकर वरील प्रसंगात रेड्डीची मालीश करतो, रेड्डी मध्ये मध्ये जोर जोरात विव्हळतो)

**हुसन्या** : (बाहेरूनच) भाकर वाढा वो माय ऽऽऽ -

**पहिला** : किती भाकरी जमल्या हुसन्या ?

**हुसन्या** : (सर्वांना वाकून नमस्कार) जयसेवा ! पोटापाण्यापुरतं मालक.

**रेड्डी** : यापुढी तू जोहार कराचं नाई, गावकी मागाचं नाई, समजलं ?

**हुसन्या** : काहून जो ? मी काय घोरं मारलं कोणाचं ?

**रेड्डी** : फाआ-फाआ याची जीभ तू फाआ - असा आगाव मानूस कशाला पायजे ? आजपासून तुझी रसद बंद !!

**हुसन्या** : (आश्चर्यचकीत) गंमत त् करत नाई ना मालक ? (लोकांना) तुम्ही माहे पंच. तुमीच न्याव करा जी –

**रेड्डी** : मोठ्ठा आला न्याव वाला ! चाल भाग–

**हुसन्या** : (रागाने थरथरतो) मी बी सांगून ठिवतो. माहा साटीसराप नाई लागला त् मला सांगा जो ! आरे नासुकल्या एका घोड्यासाठी नियत फिरली थुमची ? थूऽऽ थुमच्या त् ! आयुक्शभर गाव राखलं. थुमचं हितं फायलं. थुमच्या आया भैनींची इज्जत राखत बसलो. थेचं ह्ये परसाद ? याच्याहून ओवारतो हि कोतवाली ! दुनया हातनूरहून मोट्टी हाय रे बापू–

या कोतवालीनं, या गावगाड्यानं माले ओझं वाहणारा गाढोव करून ठिवला होता– माह्या घोऱ्यानं माले बनवलं मनुक्श ! गावकी सोरली मातर गाव सोरून जाणारा मी नाई ! कोण कोणाची रसद बंद करतो ते बघू !

(पंचाना नमस्कार करून जातो, हुसन्याच्या या निर्धाराने सर्व अवाक् झाले आहेत, वरील संवाद बोलतांना पंच एकमेकांकडे पाहतात. रेड्डीची मालीश सुरू असून तो कण्हतोच आहे. पंचांतील

एक जण उठून सांगू लागतो-)

**एक** : पंचहो, या कोतवालाले कायदा कानू मालूम हाय, थो कोतवाल संघटनेचा, कारेकर्ता बी हाये! - आजकाल कायदा बदलला, गाव पंचाईताला कोणी पुसत नाही - हुसन्याची रसद बंद करण्याच्या नादात कुठी आपली -

**दुसरा** : (हसतो) काय भित्रट रे बापू तू? यवढा भितो तू पंच म्हणून कशाले बसलास पारावर?

**तिसरा** : (टाळी वाजवून) त्येची गोम यगळीच हाये - त्येच्याकडे रोजंदारीवर येणारे सर्वे परधाने हायेत गा!

(सर्व हसतात. तसा पहिला पंच रागात निघून जातो)

**दुसरा** : (पंचाना उद्देशून) आणखी कोणाला काई आब्जेक्शन?

(सर्व नाही म्हणून माना डोलावतात)

**दुसरा** : मंग ठिक हाये - गांडू हात्ती फौज कू भारी असतो बाबा, मनून इच्यारलं, आता सांगा या हुसन्याचं काय करावं?

(रेड्डी खुणेनं सर्वांना बोलावतो व खुणेने सांगतो)

**तिसरा** : काय आयडीया हाये! हुसन्याला बोलाचं नाही, माराचं नाही - माराचं ते घोड्याला आगर हुसन्याच्या पोराला!

**रेड्डी** : (रागावून) याच्या पोटामंदी एकबी गोस्ट ठरत नाही - कसा बे तू पंच? या कानाची त्या कानाला बी गोस्ट कळली नाई पायजे, समजले? (सर्व माना डोलावतात हळूहळू या भागावर अंधार होतो. दुसऱ्या भागाने वाजत गाजत मोहरमची सवारी येते आहे. सवारीचे झाड नाचवत एकजण येतो. जगा मोहरमचा वाघ होऊन पुढे नाचत आहे. लोक 'दुल्ला-दुल्ला-दुल्ला' म्हणून नाचताहेत)

**एक** : (जोशात) बोला! दुल्ला - दुल्ला - दुल्ला--

**सर्व** : (नाचत) दुल्ला - दुल्ला - दुल्ला--

**तिसरा** : (नाचत) शाबाय - शाबाय - शाबाय

**चौथा** : (नाचत) भले - भले - भलेऽऽ

(रेड्डी लंगडत लंगडत. सवारीला आडवा जातो)

**रेड्डी** : थांबवा - सवारी थांबवा!

(लोक थांबतात, जंगा व सवारीचे झाड मात्र नाचतच) इसरले कारे परधाने हो? सवारीचा पयला मान कोणाचा? तरी बी माह्या आंगणात ५ दिवसात एकदाबी सवारी नाचवली नाही, खरं का खोटं? नी अम्मान देंगूस्ता परधाने हो! चला माझ्या अंगणात--

**वृद्ध** : (पुढे येऊन) रेड्डी मालक, मोहरम सण गावात परधान लोकांचा अस्तो. तुमच्या जातवाल्यानी सवारी घिऊन नका येऊ म्हणून बजावलं त मंग कशाला येऊ? आज सवारीचा आखरी दिवोस! तवा हितचं करा पुजा--

**रेड्डी** : (शांतपणे) सवारीचा मानपान माह्यावानी कोणी केला? सवारीला सर्वात जास्ती वर्गणी मीच देल्ली कि नाई? (इतक्यात सवारीचे झाड असलेला माणूस अंगात येऊन उभ्यानेच घुमू लागतो -- 'हूं हूं हूं' असा आवाज करतो, तसा रेड्डी त्याच्या समोर जाऊन पाया पडतो)

-- देवा, माही काही चूक झाली का?

**झाड** : (मोठ्याने, घुमत) चूक करून वर बोंब ठोकतो का रे रेड्डी? मी काय तुह्या वर्गणीवर जगतो का?

**रेड्डी** : (गयावया) नाई देवा - नाई देवा--

(जंगा गोल गोल वाघाच्या वेषात नाचतो आहेच, रेड्डीची रेनी त्याला खुणावते आहे, तसा तसा तो जोशात येऊन नाचतो आहे, दुरून घोड्याचे खिंकाळणे ऐकू येते आहे --)

**झाड** : (रेड्डीला) तू गावचा कोण हायेस?

**रेड्डी** : (विनवत) सरपंच आन् पाटील.

**झाड** : थू आसा कसा रे पादरफुस्क्या सरपंच ? मले गावामंदी जागा नाई , पीठ नाई

**रेड्डी** : (विनवत) देवा , जागा दिली, समजा !

**झाड** : माहा जे ठिकाण हाये, थ्या परधानपुऱ्यात पाण्याची इहीर नाही, दिवाबत्ती नाही --

**रेड्डी** : (विनवत) ग्राम पंचातीचा ठराव करून देतो देतो-

(जंगा नाचत नाचत गर्दीच्या बाहेर निघून जातो, रेनी ही हळूच निघून जाते, गर्दी झाड आणि रेड्डीचा संवाद ऐकण्यात गुंगली आहेत. घोड्याचे खिंकाळणे वाढत जाते, जंगा व रेनी सवारीच्या गर्दीतून पळून गेली आहेत)

**झाड** : उद्या थू जे कराल चाल्ला हायेस, थे मालूम हाये मला - थुला त्येचा दंड होईल -

**रेड्डी** : (विनवत) नाई नाई, मी तसं काई करणार नाही --

**झाड** : केलं नाई केलं तरी बी तुहं नाक कापून जाईल - गावचं भलं कर, भलं होईल !

**कोरस** : (नाचत) 'दुल्ला - दुल्ला - दुल्ला'

(रेड्डी सवारीला नमस्कार करतो. अंधार पडतो रेड्डी निघून जातो. सवारी जोशात नाचवली जाते. रात्र झाली आहे. सवारी नाचतेच आहे. हळूहळू त्या भागावर अंधार होतो. दुसऱ्या भागावर प्रकाश पडतो. हुसन्या परधान आपला हरवलेला घोडा शोधतो आहे, तर समोर रेड्डी हातात काठी घेऊन उभा.)

**रेड्डी** : हुसन्या, सांग माही पोरगी रेनी कुठी हाये ?

**हुसन्या** : रेड्या रामलू, माहा पोर्गा आन घोरा कुठी हाये ?

**रेड्डी** : आरे व्वा ! मेरी बिल्ली मेरे कूही म्याँव म्याँव ? गावात तुहा पोर्गा आन् माही पोर्गी नाही दिसत. माह्या पोरीवर काय जादुटोणा करून गायब केली सांग ?

**हुसन्या** : तुह्या सवालाचा जबाब देयाला मी काय कोतवाल हाये ?

**रेड्डी** : (जवळ येत, काठी फेकून) हुसन्या, तुहा घोडा माले नको मातर माही रेणूका वापस दे--

**हुसन्या** : माह्या हातात असती त् वापस केली अस्ती !

**रेड्डी** : आरे, सवारीसमोर मी वचन घेतलं हाये ! या गावाचं - परधानपुऱ्याचं भलं कराचं - बालाजीची शपथ घेतली रे मी !

**हुसन्या** : मंजे सौ चुहे खाले बिल्ली हज को चली--

**रेड्डी** : काय बी मन, मी आयकन. मातर माही पोरगी सोधून आण जो ! नाही त् तुही खैर नाई (दरडावून) हुसन्या - (दुरून घोड्याचा खिंकाळण्याचा आवाज येतो आहे.)

बग बग, तुहा घोडा वापस आला, आता माही पोर्गी ?

(हुसन्या घोड्याच्या खिंकाळण्याने बेभान झाला आहे, तो मोहरमच्या वाघासारखा नाचत म्हणतो)

**हुसन्या** : दुल्ला - दुल्ला - दुल्ला - ऽऽ

**रेड्डी** : हुसन्या - हुसन्या - हुसन्या ऽऽ

**हुसन्या** : (घोडा मोठ्याने दुरून खिंकाळतो आहे, म्हणून तोही मोठ्याने) दुल्ला - दुल्ला - दुल्ला

**रेड्डी** : (मोठ्याने ओरडून) हुसन्या --

**हुसन्या** : (मोठ्याने) दुल्ला - दुल्ला - दुल्ला ऽऽ--

(घोड्याचा खिंकाळण्याचा आवाज मोठा होत आहे. हुसन्या जोरात नाचतो, डफडयाचा आवाज, रेड्डी हुसन्याच्या पाठीमागे असहाय्य फिरतो -- घोडा मोठ मोठ्याने खिंकाळतांनाच पडदा पडतो)

# अनेक वर्षांपासून

— रवि कुरसंगे

*अनेक वर्षांपासून*
*जिथे पडलाय जो खडा*
*अनेकानेक वर्षांपासून*
*जिथे रेंगाळतोय वाढतोय कोणत्याही योनीतला जो कुणी किडा*
*त्याना स्विकारून जसेच्या तसे*
*नि न लावता धकाही त्यांच्या अस्तित्वाच्या कोणत्याहि कशाला*
*जाऊ या अभ्युदयाकडे सर्वंकष विकासाकडे*

*अरे ही सैतानी - प्रवृत्ती पिलावळ*
*माणसामाणसाची मसणवटी करू पहातेय*
*वारकऱ्यांचे भगवे डोळे वाटून*
*नि*
*हिरवाचंद्र तळहातावर ठेवून*
*अरे उत्खननात सापडलेल्या*
*मृत मोहंजदरो हडप्पा नि तत्सम संस्कृत्यांच्या अवशेष सांगाड्याना*
*आम्ही जपतच आलो आहोत म्युझियम्समधून अत्यंतिक कणवेनं*
*मग आजच का शिकवतो आहोत*
*ह्या रक्ताच्या धगीला द्वेष मत्सर हल्ला*
*इतरांप्रमाणेच आपल्याही मांसाला असते अविट चव*
*हिंस्रतेच्या क्रूरतम जबड्याची लालसा नि भूक भागवणारी*
*लक्षात घ्या*
*झगडा अस्तित्व टिकवण्याचा नाहीए*
*तर झगडा आहे विनाशायचं कुणी याचा*

*एखाद्या खंडप्राय वृक्षावरच्या डहाळ्यानी*
*प्रकाश दिशेने सरसावताना एकामेकाला*
*करकचून घासावे*
*त्या घर्षणातून पेटावा वणवा*
*नि व्हावे अनिश्चित खंडप्राय वृक्ष सांभारातले पान फूल वेल डहाळ फळ*

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

हे निसर्गनियमन एकवेळ समजू शकतो
पण
इतिहासातल्या कबरीत
सडत कुजत गारढोण पडलेल्या उध्वस्त मढ्यांना जागवून
अराजक माजवणाऱ्या हातचलाख नजरबंदी मांत्रिकानो
आपल्या दारावर
नवनविन आव्हानं मारत असताना गजमुसंडी धडका
का तुम्ही करत सुटलाय भक्कम चौकटबाज चंग
का तुम्ही मिरवत सुटलाय मध्ययुगीन सुवर्णमहोत्सवांची रोषणाई
अंधश्रद्धाळू ताठर
जर आपण टाळले
ह्या अस्तित्वावर भगवे हिरवे निळे नि आणिक कोणतेही लेबल
लावून घेण्याचे
जर आपण हेटाळले
हव्यास प्रासंगिक / प्रादेशिक कपट कूट नीतितून जन्मलेल्या अमूकतमूक आकाराचे
तरच
मानव योनीत जन्म घेतल्याचं खरं मांगल्य
आपल्याला प्राशन करता येईल ओंजळभर
नि निर्दयी वणवाहि अंकुरेल हिरवीजर्द डहाळी होऊन
म्हणूनच
अनेक वर्षांपासून
जिथे पडला आहे जो खडा
अनेक वर्षांपासून
जिथे रेंगाळतोय वाढतोय कोणत्याही योनीतला जो कुणी किडा
त्याना स्विकारून जसेच्या तसे
नि न लावता ढकाहि त्यांच्या अस्तित्वाच्या कोणत्याही कशाला
जाऊ या अभ्युदयाकडे सर्वंकष विकासाकडे
जाऊ या मांगल्याकडे
जाऊ या पुण्यप्राचीकडे

# महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या–
# जनगणनेच्या आकडेवारीचे शोधक विश्लेषण

लेखक : जॉन गायकवाड

अनुसूचित जमातींच्या संदर्भात सन १९७१ सालच्या जनगणनेचा विचार केल्यावर असे दिसून येईल की, ही जनगणना एकूष २ फेऱ्यात पूर्ण झालेली आहे. (अ) पहिली फेरी सन १९६१ च्या धर्तीवर क्षेत्रबंधन गृहीत धरून / क्षेत्रबंधनाचा अंमल असताना, (ब) दुसरी फेरी सन १९७६ साली क्षेत्रबंधन उठविण्यात आल्यानतार.

अनुसूचित जमातींची १९७१ सालची जनगणना २ फेऱ्यात पूर्ण झालेली दिसत असली तरी प्रत्यक्षात गणना/मोजणी केवळ एकाच फेरीत पूर्ण होऊन सन १९७६ साली क्षेत्रबंधन उठविल्यानंतर प्रत्यक्षात अनुसूचित जमातींचे असूनही केवळ क्षेत्रबंधनामुळे अनु. जमातींचे म्हणून घोषित न झालेल्यांची, क्षेत्रबंधन उठविण्यात आल्यानंतर अनुसूचित जमातींचे म्हणून गणना करण्यात आली.

१९७१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ५०४.१२ लाख इतकी आहे. पहिल्या फेरीत, महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जमातींची लोकसंख्या २९.५४ लाख इतकी होती. म्हणजे पहिल्या फेरीच्या गणनेनुसार राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ५.८६% इतकी अनुसूचित जमातींची लोकसंख्या होती. दुसऱ्या फेरीत अनुसूचित जमातींची लोकसंख्या ३८.४१ लाख इतकी झाली. म्हणजे राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ७.६२% इतकी अनुसूचित जमातींची लोकसंख्या होती. (क्षेत्रबंधन उठविल्यामुळे अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येच्या गणनेत ३०.०३% इतकी वाढ झाल्याचे दिसते.)

१९८१ सालच्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ६२७.५० लाख इतकी आहे, तर अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्या

कोष्टक क्र. १ : राज्यातील अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे प्रमाण (%)

| | राज्यातील एकूण लोकसंख्या (लाखात) | राज्यातील अनु. जमातींची लोकसंख्या (लाखात) | अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे प्रमाण (%) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १९७१ | ५०४.१२ | २९.५४ | ५.८६ | |
| १९७६ (क्षेत्रबंधन उठविण्यात आल्यानंतरची फेर मोजणी) | (५०४.१२) | ३८.४१ | ७.६२ | (क्षेत्रबंधन उटविण्यात आल्यानंतरची मोजणी ३०.०३% वाढली) |
| १९८१ | ६२७.५० | ५७.७२ | ९.२० | |

* अधिव्याख्याता., आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

| कोष्टक क्र. २ : क्षेत्रबंधन उठविण्यापूर्वी व नंतर लोकसंख्या वाढीचा दशकनिहाय दर - (प्रत्यक्ष) | | | | |
|---|---|---|---|---|
| | १९६१ | १९७१ (अ) | १९७१ (ब) | १९८१ |
| एकूण लोकसंख्या (अनुसूचित जमाती) लाखात | २३.९७ | २९.५४ | ३८.९१ | ५७.७२ |
| दशक | (१) १९६१-७१ (अ) | | (२) १९७१ (ब)-८१ | |
| दशकनिहाय वाढीचा दर | २३.२४ | | ५०.२७ | |

५७.७२ लाख आहे. म्हणजेच राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९.२०% इतकी अनुसूचित जमातींची लोकसंख्या असल्याचे दिसते.

१९६१ ते १९८१ या दोन दशकांतील "लोकसंख्या वाढीचा दर" लक्षात घ्यावयाचा झाल्यास, समान पातळीवरील लोकसंख्येचा विचार करणे आवश्यक असल्यामुळे या दोन दशकातील लोकसंख्या वाढीचा विचार पुढीलप्रमाणे दोन टप्प्यांमध्ये करणे योग्य होईल.

१. १९६१ ते १९७१ (अ)

२. १९७१ (ब) ते १९८१.

१. १९६१ ते १९७१ (अ) - या दशकातील लोकसंख्या वाढ लक्षात घेता, दशकनिहाय वाढीचा प्रत्यक्ष दर २३.२४ इतका आहे.

२. १९७१ (ब) ते १९८१ - या दशकातील लोकसंख्या वाढ लक्षात घेता, दशकनिहाय वाढीचा प्रत्यक्ष दर ५०.२७ इतका आहे.

कोष्टक क्र. ३ : क्षेत्रबंधन उठविण्यात आले नाही असे गृहीत धरून १९६१-१९७१ (अ) या दशकातील वाढीच्या दराने १९८१(अ) ची प्रक्षिप्त (प्रोजेक्टेड) लोकसंख्या.

क्षेत्रबंधन उठविण्यात आले नाही, व १९६१ ते ७१ (अ) या दशकांतील लोकसंख्या वाढीचा दर १९७१ (अ) ते १९८१ (अ) या दशकातही कायम राहिला असे गृहीत धरल्यास १९८१ (अ) यावर्षी अनुसूचित जमातींची लोकसंख्या ३६.४१ लाख इतकी अपेक्षित आहे.

कोष्टक क्र. ४ : क्षेत्रबंधन उठविण्यात आल्यानंतर १९७१ (१९७६)

च्या धर्तीवर १९८१ (ब) ची प्रक्षिप्त (प्रोजेक्टेड) लोकसंग्या

| कोष्टक क्र. ३ | | | |
|---|---|---|---|
| | १९६१ | १९७१(अ) | १९८१(अ) |
| अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्या (लाखात) | २३.९७ | २९.५४ | (३६.४१) (प्रक्षिप्त) |
| दशक | १९६१-७१ (अ) | १९७१(अ) - ८१(अ) | |
| दशकनिहाय वाढीचा दर | २३.२४ | | |

| | १९८१ (अ) | १९८१ (ब) |
|---|---|---|
| अनुसूचित जमातींची एकूण लोकसंख्या (लाखात) | ३६.४१ | (३६.४१) (३०.०३% - क्षेत्रबंधन उठविल्यानंतर झालेली प्रत्यक्ष वाढ) (कोष्टक १ वरून) (४७.३४) : (क्षेत्रबंधनामुळे पूर्वी वगळण्यात |

क्षेत्रबंधन उठण्यापूर्वी १९८१(अ) च्या प्रक्षिप्त लोकसंग्येत, क्षेत्रबंधन उठविल्यानंतर झालेली प्रत्यक्ष वाढ ३०.०३% (कोष्टक १ वरून) मिळविल्यास क्षेत्रबंधनामुळे पूर्वी वगळण्यात आलेली लोकसंख्या धरून १९८१(ब) ची अपेक्षित लोकसंग्या ४७.३४ लाख इतकी आहे.

कोष्टक क्र. ५ : क्षेत्रबंधन उठविण्यात आल्यानंतर १९७१ (ब) - १९८१ (ब) या दशकातील वाढीचा प्रक्षिप्त (प्रोजेक्टेड) दर.

| | १९७१ (ब)* | १९८१ (ब)* |
|---|---|---|
| अनुसूचित जमातींची लोकसंख्या (लाखात) | ३८.४१ | (४७.३४) (प्रक्षिप्त) |
| | (*क्षेत्रबंधनामुळे पूर्वी वगळण्यात आलेली लोकसंख्या धरून) | |
| दशक | १९७१ (ब) - ८१ (ब) | |
| दशकनिहाय वाढीचा दर | (२३.२५) प्रक्षिप्त) (प्रोजेक्टेड) | |

क्षेत्रबंधन उठविण्यात आल्यानंतर १९७१ (ब) साली, पूर्वी वगळण्यात आलेली जनगणनेची लोकसंख्या लक्षात घेता, एकूण लोकसंख्या ३८.४१ लाख इतकी घोषित करण्यात आली. कोष्टक ४ अनुसार १९८१(ब) या वर्षासाठी प्रक्षिप्त लोकसंख्या ४७.३४ लाख - विचारात घेता असे दिसून येईल की १९७१(ब) ते १९८१ (ब) या दशकाच्या लोकसंख्या वाढीचा दर २३.२५ इतका अपेक्षित आहे. म्हणजेच १९६१ ते १९७१ (अ) व १९७१ (ब) ते १९८१ (ब) या दोन्ही दशकात दशकनिहाय लोकसंख्या वाढीचा दर सारखाच अनुक्रमे २३.२४ (कोष्टक क्र. २) व २३.२५ (प्रक्षिप्त) असल्याचे दिसते.

१९७१ (ब) ते १९८१ (ब) या दशकाच्या अपेक्षित लोकसंख्या वाढीच्या दरात (२३.२५) सर्वसाधारणपणे २.२३ (म्हणजेच २३.२५ च्या १०%) इतके अधिक मिळविल्यास अपेक्षित लोकसंख्या वाढीचा दर २५.५८ च्या आसपास असावयास पाहिजे. परंतु असे दिसून येईल की, १९७१(ब) ते १९८१ या दशकाच्या लोकसंख्या वाढीचा प्रत्यक्ष दर ५०.२७ इतका आहे. तरी अपेक्षित लोकसंख्या वाढीचा दर (२३.२५ ते २५.२८) व प्रत्यक्षात दिसून आलेला लोकसंग्या वाढीचा दर (५०.२७) यातील तफावत ही निश्चितच अस्वाभाविक आहे. तसेच १९८१ ची प्रत्यक्ष लोकसंख्या (५७-७२ लाख) (कोष्टक क्र. १), व अपेक्षित लोकसंख्या - (४७.३४ लाख) - (कोष्टक क्र. ४) - यातील तफावत (१० लाख) - ही निश्चितच अस्वाभाविक आहे.

क्षेत्रबंधन उठविण्यात आल्यानंतर "बिगर आदिवासींनी जनगणनेच्यावेळी, अनुसूचित जमातीचे आहोत अशी नोंद करून घेतली, हीच या अस्वाभावि-कतेमागील सर्वाधिक शक्यता असावी असे वाटते.

(संदर्भ : "A Demographic Profile of Tribals in the State of Maharashtra".

Gaikwad John S. (RB September, 1986)

(Vol. IX, No. 1)

**पुस्तक परीक्षण**

### जंगल-जिव्हाऱ्यातील आदिमतेचे वास्तवदर्शन :

# "इंद्रावतीच्या परिसरातील माडिया जमात"

लेखक : **प्रा. विनायक तुमराम**

"इंद्रावती परिसरातील माडिया जमात" हे श्री. म.रा. बडवे यांचे पहिलेवहिले पुस्तक २१ ऑगस्ट १९९० रोजी प्रसिद्ध झाले. हे पुस्तक लिहून श्री. बडवे यांनी इंद्रावती परिसरात अनादी काळापासून गुजराण करीत असलेल्या माडियांच्या जीवन-संस्कृतीचे सम्यक दर्शन त्यांच्या लोकसाहित्यासकट समाजाला घडविले आहे. जगल-जिव्हाऱ्यातील आदिमतेशी नाते. सांगणारे हे पुस्तक आहे. जसे दर्शन तशीच अभिव्यक्ती हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य होय.

इंद्रावतीचा परिसर हा गडचिरोली जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम असा प्रदेश आहे. घनदाट जंगलांनी, नद्यानाल्यांनी वेढलेला आणि क्रूर श्वापदांनी गजबजलेला इंद्रावतीचा परिसर म्हणजे "काळे पाणी" मानले जाते. अशा या परिसरात राहणारी व निसर्गाच्या मर्जी-लहरीनुसार वागणारी माडिया ही एक शूर व अत्यंत मागास परंतु संस्कृतीसंपन्न जमात होय. नुसती लंगोटी नेसूनच जीवन जगणे, दिवसभर पारंपरिक आयुध खांद्यावर घेऊन रानोमाळ भटकणे व मिळालेल्या शिकारीवर - कंदमुळांवर भूक भागविणे आणि आपल्याच रुढी - परंपरांना पालीसारखे चिकटून बसणे ही या जमातीची काही वैशिष्ट्ये होत. कुणी त्यांना 'जंगलचे अनभिषिक्त राजे' म्हणतात तर कुणी त्यांना 'वनराईची लेकरे' म्हणून संबोधतात. परंतु स्वातंत्र्यानंतरच्या बेचाळीस वर्षात काही मोजकेच सुशिक्षित तरुण वगळल्यास या जमातीची शैक्षणिक प्रगती निराशजनकच आहे. कराल दारिद्य त्यांच्या वाट्याला आलेले आहे.

अनेक समाज शास्त्रज्ञांनी या जमातीचा "प्रीमीटीव्ह ट्राईब्ज" असा उल्लेख आपापल्या ग्रंथांमध्ये केलेला आहे. बऱ्याचशा अभ्यासकांनी या जमातीवर शोधप्रबंधही लिहिले असून तिच्या सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय वैशिष्ट्यांवर भरपूर प्रकाश टाकला आहे. श्री. म. रा. बडवे यांनी देखील या जमातीचा वस्तुनिष्ठ अभ्यास प्रस्तुत पुस्तकाच्या माध्यमातून सादर केला आहे. महसूल खात्यातील नोकरीच्या निमित्ताने श्री. बडवे यांना इंद्रावतीच्या परिसरातील अहेरी, एटापल्ली, भामरागड, जिमलगट्टा, लाहेरी, जंबीया, बेनागुंडा या माडियांच्या गावात राहावे लागले. त्यामुळे माडियांचा हा भू-प्रदेश तेथील एकांतपूर्ण वातावरण व पारंपरिक वैशिष्ट्यांनी नटलेले त्यांचे जीवनवास्तव त्यांना जवळून पाहता आले, अनुभवता आले. हा अनुभवच प्रस्तुत पुस्तकाच्या लेखनामागील प्रेरणा आहे. जे अनुभवले तेच शब्दरुप घेऊन प्रगटले. परंतु केवळ कुतुहल म्हणून त्यांनी या जीवनाकडे कधीही पाहिले नाही, तर मानवतेच्या सात्विक दृष्टीकोनातून त्यांनी या जीवनाचा व त्या मागील जाणीव-प्रेरणांचा वस्तुनिष्ठ शोध घेतला. हा वस्तुनिष्ठ शोध म्हणजेच प्रस्तुत पुस्तक होय.

हे पुस्तक वाचतांना माडियांच्या जीवन-संस्कृतीविषयीचा लेखकाच्या अंतरातील अकृत्रिम

जिव्हाळा क्षणोक्षणी जाणवतो. पद्धतशीरपणे या पुस्तकातील प्रकरणांची मांडणी करण्यात आलेली आहे. गोंडांच्या कुळकथा, माडियांचे गोंडांशी असलेले साम्य - भेद, माडियांचे कुळचिन्ह, कुळगोत्र, त्यांच्या देवदेवता, रुढी - परंपरा, बोलीभाषा, विवाहप्रथा, त्यांचे रितीरिवाज, आचारविचार, राहणीमान, उपजिविकेची साधने, सणोत्सव, दागदागिने अशा अनेक सूक्ष्म बाबींवर श्री. बडवे यांनी प्रकाश टाकला आहे. इतरांना न कळलेले त्यांचे सांस्कृतिक वेगळेपण शब्दबद्ध केले आहे. माडियांमध्ये पूर्वी "नरबळी" ची कुप्रथा अस्तित्वात होती. आता ती संपुष्टात आलेली आहे. ही प्रथा अस्तित्वात असण्याची कारणे कोणती, याचाही मागोवा श्री. बडवे यांनी घेतला आहे. विशेष म्हणजे माडियांची बोलीभाषा व तिचे शब्द - वैभव याची चर्चा स्वतंत्रपणे करण्यात आली आहे. माडिया भाषा ही गोंडीभाषेची एक बोली समजली जाते. इतरांना न कळणारी अशी ही बोली आहे. ती समजावी या दृष्टीने "माडिया भाषा मार्गदर्शक" आणि "माडिया भाषेचा शब्दसंग्रह" अशी दोन स्वतंत्र प्रकरणे पुस्तकात समाविष्ट करण्यात आली आहेत.

"काही प्रचलित माडिया गीते" या मथळ्याखाली माडियांच्या काही पारंपरिक लोकगीतांचाही परिचय करून देण्यात आला आहे. परिस्थितीजन्य वैशिष्ट्यांची छाप घेऊन अवतरलेली आणि मौखिक परंपरेने माडियांच्या पिढ्यापिढ्यातून अव्याहतपणे येथवर झिरपत आलेली माडियांची ही मनमोहक लोकगीते आहेत. या गीतातून माडियांच्या काव्यवृत्तीचा सहज परिचय वाचकाला होऊन जातो. लोकगीते हा माडियांचा स्थायीभाव आहे. त्यांच्या काव्यप्रतिभेचे ते सहज दर्शन आहे. आपल्या पारंपरिक वाद्यांच्या संगीतावर माडिया ही गाणी गाऊन नृत्य करतात व आपल्या सांस्कृतिक मूल्यांचे जतन करतात. नमुन्यादाखल, लग्नाच्यावेळी गायिल्या जाणाऱ्या माडीया गीताच्या पुढील काही ओळी किती भावपूर्ण आहेत हे पहा,

*"कोईली कोईली रे - रेलोऽरेऽरेऽलोऽऽ*
*निके बगडल बुबल, आटे निकुल बुबल*
*लोने आदेमती आदे निकून यायल*
*लोने दादल गते ओटे निकून दादल ...१*
*रेऽरेऽलोऽयेऽरे - लो तमरोय लालसा*
*निकेर बगडल बुबल रेऽरेऽलाऽरेलाऽऽऽ ....२*
*(भावार्थ : तुला आता कोठचा बाप मिळणार आहे ?*
*तुझा सासरा म्हणजे बाप, तुझी सासु म्हणजे आई*
*तुझा देर भासरा म्हणजे भाऊ*
*सासुरवाडीतील सर्वांना आपले समजून*
*सर्वांशी मिळून मिसळून सुखाने रहावे ...१..२)*

माडीयांची रानोमाळ विखुरलेली ही शब्दसंपत्ती श्री. बडवे यांनी मोठ्या कष्टाने मिळविली आहे. अनावधानाने राहिलेल्या काही किरकोळ चुका (उदा. परधान ऐवजी "प्रधान" असा शब्दप्रयोग, कंगाली ऐवजी "कंगाळी" असा शब्दप्रयोग.) वगळल्यास माडिया जीवन - संस्कृतीचा संपूर्ण आलेख साध्या-सोप्या शब्दात श्री. बडवे यांनी प्रस्तुत पुस्तकाच्या रुपाने वाचकांपुढे उभा केला आहे. आपल्या मतांच्या समर्थनार्थ त्यांनी डॉ. ग्रागसन, हेमनडॉर्फ, हट्टन, हंट, सर रिजले इ. सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांच्या व मानववंशशास्त्रज्ञांच्या मतांचा हवाला आवश्यकतेनुसार दिलेला आहे. गिरीजाकुंडरात पशूपातळीवरचे जीवन व्यतीत करणाऱ्या माडियांच्या व्यथा-वेदनांची, प्रश्न-समस्यांची व सुख:दुखांची चर्चा करणारे एखादे स्वतंत्र प्रकरण या पुस्तकात असायला हवे होते. बदलत्या काळाला अनुलक्षून त्यांच्यात होत

असलेल्या सामाजिक परिवर्तनांचा व त्यासाठी त्यांनी स्वीकारलेल्या भूमिकेचाही विचार होणे गरजेचे होते. ही उणीव प्रस्तुत पुस्तक वाचतांना प्रकर्षाने जाणवते. तथापि वास्तवाला भिडण्याचे सामर्थ्य या पुस्तकातील लेखनाचे ठायी आहे हे मान्य केलेच पाहिजे.

एकशे बत्तीस पृष्ठांचे हे पुस्तक श्री. बडवे यांनी स्वत: प्रसिद्ध केले आहे. चंद्रपूरचे सुप्रसिद्ध कादंबरीकार व पत्रकार प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या समर्थ लेखणीतून साकारलेली प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. नागपूरचे श्री. संजय धोतरकर यांनी आकर्षक मुखपृष्ठ सजावट केली असून नारायण मुद्रणालय नागपूरचे श्री मधुसुदन बनहट्टी यांनी सुबक छपाई केली आहे. चंद्रपूरचे सुप्रसिद्ध छायाचित्रकार श्री. शरद ताम्हण यांनी काढलेली माडियांची काही खास छायाचित्रे पुस्तकात समाविष्ट केल्यामुळे पुस्तक अधिक आकर्षक बनले आहे. श्री. बडवे यांचे प्रस्तुत पुस्तक हे संशोधन पद्धतीच्या मान्य निकषांवर संपूर्णत: उतरणारे नसले तरी वर्तमानकाळातील माडिया जीवन-संस्कृतीचा व त्यांच्या बदलत्या जीवन-जाणीवांचा अभ्यास करण्यास निश्चितच उपयुक्त ठरेल, यात शंका नाही.

*"इंद्रावतीच्या परिसरातील*
*माडिया जमात" पृ. १३२*
*लेखक व प्रकाशक : श्री. म. रा. बडवे, चंद्रपूर.*
*मूल्य रुपये ६०/-*

## सुगंधवेड्यांचा प्रश्न

*साऱ्या सजीववंशाला*
*संमोहीत करणारी फुलं*
*अुगवत असतात आमच्या मातृकुशीत!*
*त्या सर्व पुष्पदर्पात*
*दडलेली असतात आमची*
*रक्तलांच्छित नागवी पावलं*
*व बंदिस्त असतो इतिहास*
*तळहातावरील फोड फुटू न देण्याचा!*
*तुम्हाला वाटतं सालं; किती सहज गावलं...*
*हिरव्यागर्द बिछान्यावरच्या*
*मनोहारी फुलांच्या राज्यात*
*अनायासे तुम्ही विसरत जाता*
*हर पुष्पदलांत पेरलेलं*
*आमच्या धर्मबिंदूचे रंगहीन अस्तित्व!*
*आणि खुशाल सांगत सुटता*
*ह्या फुलावरील तुमचं अधिपत्य...*

• • •

*सांगा, बापड्यांनो! खुशाल सांगा!!*
*वनवासी फुलांतील आदिवासी*
*आदिगंधाशी असलेले ऋणानुबंध*
*आता सैल होत जाताहेत...*

• • •

*हल्ली म्हणे, येथे न्याय (?) नांदतो*
*प्रश्न-प्रश्नचिन्ह: निरंतर व निरुत्तर...!*

**-- वैभवकुमार ए. शेरे अटकळीकर**

# सूची


अंक पहिला : जानेवारी-मार्च................................१९८० - जबरन जोत जंगल जमीन
अंक दुसरा : एप्रिल-जून......................................१९८० - आदिवासी व शिक्षण
अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर....................................१९८० - आदिवासी व वनसंवर्धन
अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर ..............................१९८१ - आदिवासी साहित्य व कला
अंक पाचवा : जानेवारी-मार्च ................................१९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती
अंक सहावा : एप्रिल-जून .....................................१९८१ - आदिवासी व आरोग्य
अंक सातवा : जुलै-सप्टेंबर ...................................१९८१ - वनशेती व संवर्धन
अंक आठवा : ऑक्टोबर-डिसेंबर ............................१९८१ - रोजगार हमी योजना
अंक नववा : जानेवारी-मार्च...................................१९८२ - उत्तरा खंड अभ्यास मोहीम
अंक दहावा : एप्रिल-जून.......................................१९८२ - धरणे व विकास
अंक अक्रा-बारा : जुलै-डिसेंबर...............................१९८२ - जंगल व्यवस्थापन
अंक तेरावा : जानेवारी-मार्च ..................................१९८३ - आदिवासी व दारू
अंक चौदावा : एप्रिल-जून .....................................१९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर..................................१९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य
अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर ..........................१९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून .........................१९८४ - आदिवासीमधील स्वयंसेवी कार्य
अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर ..........................१९८४ - आदिवासी स्त्री
अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ..........................१९८४ - आदिवासींचे आरोग्य व शिक्षण
अंक एकविसावा : जानेवारी-मार्च..........................१९८५ - आदिवासी संघटन
अंक बाविसावा : एप्रिल-जून ................................१९८५ - जमीन हस्तांतर
अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर ..............................१९८५ - आदिवासी महिला
अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर .......................१९८५ - आदिवासी व सरकार
अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च .........................१९८६ - जंगल व धरण
अंक सव्विसावा : एप्रिल-जून ...............................१९८६ - आदिवासी कला
अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर...........................१९८६ - आदिवासी व वेठबिगारी
अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ...................१९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च .....................१९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
अंक तिसावा : एप्रिल-जून ...................................१९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर........................१९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
अंक तेहतीस : जानेवारी-मार्च ..............................१९८८ - सवलती अपहरणाची समस्या
अंक चौतीस : एप्रिल-जून.....................................१९८८ - आदिवासी साहित्य
अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर .......................१९८८ - आदिवासी समाज व संस्कृती
अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून......................१९८९ - डॉ. वेरीर एलवीन विशेषांक
अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर................१९८९ - व्यवसाय मार्गदर्शन
अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून...............१९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर ..............................१९९० - जागतिक आदिवासी
अंक चव्वेचाळीस : आक्टोबर-डिसेंबर .....................१९९० - गं.बा. सरदार स्मृति विशेषांक
अंक पंचेचाळीस-सेहचाळीस : जानेवारी-जून ............१९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्याबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद २५० रुपये

परिषद वार्षिक सभासद २५ रुपये

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :—**

रा. के. मुटाटकर, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

हाकारा त्रैमासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांचेकडून अर्थसहाय्य मिळाले आहे.

Impressions, Bgm, T